



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६५ वे * अंक ९० * नांदेड * सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211





# अखेर सुनेत्रा पवारांच्या विरोधात काँग्रेस उमेदवार जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)** –अजित पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विरोधात लढण्याकरिता काँग्रेसने आपला उमेदवार रिंगणात उतरवला आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी बारामतीसाठी काँग्रेसकडून आकाश विश्वनाथ मोरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. सोमवारी सकाळी ११ वाजता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे आकाश विश्वनाथ मोरे यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी बारामतीला जाणार आहेत.

बारामती विधानसभेची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी महायुतीने पुढाकार घेतला होता. मात्र काँग्रेस पक्षाने पहिल्यापासून बारामती विधानसभा लढण्याचे ठरवले होते. त्यानुसार काँग्रेलने आकाश विश्वनाथ मोरे यांना बारामतीच्या रणांगणात उतरवण्याचे ठरवले आहे. आकाश मोरे सोमवारी विधानसभा



निवडणुकीसाठीचा अर्ज भरणार असल्याचे कळते आहे. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्याविरोधात आता अधिकृतपणे काँग्रेस उमेदवाराचे आव्हान असणार आहे.

बारामती विधानसभेची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि खुद्द सुनेत्रा पवार यांनी भरपूर प्रयत्न केले. शिवसेना पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना फोन करून पाठिंबा देण्याचे आवाहन केले. परंतु काँग्रेस पक्ष निवडणूक लढविण्यावर अखेपर्यंत ठाम होता. अखेर, रविवारी रात्री काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्या आदेशानुसार आकाश विश्वनाथ मोरे यांना उमेदवारी दिली गेली. बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उप-मुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा सोमवार, ६ एप्रिल २०२६ रोजी बारामती दौरा नियोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यात त्या विविध ठिकाणी भेटी देत कार्यकर्त्यांशी संवाद साधणार असून दुपारी अधिकृतपणे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. सकाळी साडे नऊ वाजता विद्या प्रतिष्ठान येथील अजित पवार यांच्या स्मृती स्थळाला भेट देऊन त्या अभिवादन करणार आहेत. त्यानंतर ते सकाळी साडे दहा ते दुपारी सव्वा बारा या वेळेत कविवर्य मोरोपंत नाट्यगृह येथे कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे, जिथे त्या मार्गदर्शन करणार आहेत. यानंतर दुपारी १२:३० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार पोटनिवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज अधिकृतपणे दाखल करणार आहेत.

# ट्रम्प यांच्या ४८ तासांच्या अल्टीमेटमवर इराणची थेट 'अणुयुद्धाची' धमकी

**इराण (वृत्तसंस्था)** –अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुजची समुद्रधुनी खुली करण्यासंदर्भात अथवा शांतता करारासाठी इराणला ४८ तासांचा अल्टिमेटम दिला होता. एवढेच नाही तर, असे न झाल्यास इराणमधील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा उद्ध्वस्त करण्याची धमकीही दिली आहे. मात्र इराणने ट्रम्प यांची धमकी थेट धुडकावून लावली आहे.

इराणच्या सेंट्रल मिलिट्री कमांडने ट्रम्प यांची ४८ तासांची धमकी धुडकावून लावली. महत्वाचे म्हणजे, इराणने ट्रम्प यांची धमकी केवळ धुडकावलीच नाही, तर असे झाल्यास अमेरिकेसाठी नरकाचे दरवाजे खुले होतील अशी थेट प्रतिधमकीही दिली आहे.

अल-अबिया केंद्रीय मुख्यालयातून जारी केलेल्या निवेदनात इराणी लष्करी जनरल अली अब्दुल्लाही अलीबादी म्हणाले, ट्रम्प याची धमकी म्हणजे, एक असहाय्य, घाबरलेले, असंतुलित आणि मूर्खपणाचे कृत्य आहे. तसेच, या संदेशाचा सरळ अर्थ म्हणजे, तुमच्यासाठी नरकाचे दरवाजे उघडले जातील. तत्पूर्वी, नुकताच राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी 'ट्रूथ सोशल'वरून एका धमकीवजा पोस्टमध्ये इराणला इशारा दिला. यात होर्मुझची सामुद्रधुनी उघडण्यासाठी ४८ तासांची मुदत दिली आहे. ट्रम्प यांनी इराणला इशारा दिला, लक्षात असू द्या, जेव्हा मी इराणला करार करण्यासाठी किंवा होर्मुझची सामुद्रधुनी उघडण्यासाठी १० दिवसांची मुदत दिली होती? आता वेळ निघून जात आहे. केवळ ४८ तासच शिल्लक आहेत.

# दत्तशिखर संस्थानचे महंत मधुसूदन भारती अनंतात विलीन

## ३१ व्या महंतपदी डॉ. योगी धनेश्वर भारती महाराज

**माहूर/ नांदेड (प्रतिनिधी)**– जगप्रसिद्ध दत्तशिखर संस्थानचे ३० वे महंत कै मधुसुदन भारती महाराज यांचे दि ४ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले होते. त्यांच्या पार्थिवावर रविवार दि ५ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता शोकाकुल वातावरणात दत्तशिखर परिसरात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लाखोंचा जनसागर उसळला होता. यावेळी भक्तांना अश्रु अनावर झाले होते.

कै. महंत मधुसूदन भारती यांचा जन्म अहिल्यानगर येथे झाला असून त्यांना वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी दत्तशिखर संस्थान येथे श्री दत्त चरणी अर्पण करण्यात आले होते. हिवरा ता. महागाव येथील शाळेत १० वीची परीक्षा झाल्यावर दीक्षा देण्याचे निश्चित झाले. त्यानंतर बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यावर संस्थांवर दत्त प्रभुंच्या सेवेत असताना कै. महंत गुरू अच्युत भारती यांचे वारस म्हणून सन १९७८ साली ३० वे महंत म्हणून गादीवर विराजमान



झाले. त्यांचा ४८ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाला असून दि. ४ एप्रिल २०२६ रोजी त्यांचे निधन झाले.

रविवार, दि. ५ एप्रिल रोजी परंपरेनुसार त्यांचे वारस म्हणून ईश्वर चिठ्ठीने योगी धनेश्वर भारती उर्फ श्याम भारती महाराज यांची ३१ वे महंत म्हणून नियुक्ती झाल्यानंतर कै. महंत गुरु मधुसूदन भारती यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी प्रचंड जनसागर लोटला होता. यावेळी लाखो भक्तांनी त्यांना अखेरचा निरोप दिला.

यावेळी माहुरकरांनी आपले सर्व प्रतिष्ठाने बंद ठेवून कै. महंत



मधुसूदन भारती यांना श्रद्धांजली अर्पण केली. तसेच माहूरवासियांतर्फे गडावर आलेल्या भक्तांसाठी दत्तनगर येथे महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. माहुर आगारातर्फे भाविकांना दत्तशिखरावर जाण्यासाठी बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. तहसीलदार अभिजित जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# ट्रम्प यांना रोखा : नोबेल विजेत्याचे खाडी देश व 'यूएन'ला आवाहन

**इराण (वृत्तसंस्था)** –इस्त्रायलने अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेले युद्ध आणखी भडकण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीचे माजी महासंचालक मोहम्मद अल-बरदेई यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक भूमिकेवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. या वेड्याला कसेही करून तातडीने रोखा, अन्यथा संपूर्ण मध्यपूर्व आगीच्या गोळ्यात लोटला जाईल, असे आवाहन अल बरदेई यांनी खाडी देश आणि संयुक्त राष्ट्रांना केले आहे.

मोहम्मद अल-बरादेई यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या इराण धोरणाचा तीव्र निषेध केला. तसेच, आखाती देशांना आणि संयुक्त राष्ट्रांना या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले. त्यांनी 'एक्स'वर अरबी भाषेत लिहिले, आखाती देशांच्या सरकारांना माझे आवाहन आहे की, हा वेडा मनुष्य संपूर्ण प्रदेशाला आगीचा गोळा बनवण्यापूर्वी, पुन्हा एकदा आपल्या संपूर्ण सामर्थ्यनि त्याला रोखण्याचा प्रयत्न करावा. तसेच, एका वेगळ्या इंग्रजी पोस्टमध्ये, हा वेडेपणा थांबवण्यासाठी काहीच करता येणार नाही का? असा थेट प्रश्नही त्यांनी संयुक्त राष्ट्रांना विचारला आहे.

# धाराशिवच्या प्रत्येक गावात संध्याकाळी २ तास टीव्ही, मोबाईल बंद राहणार, जिल्हा परिषदेचा विद्यार्थ्यांसाठी निर्णय

**धाराशिव (प्रतिनिधी)** –धाराशिव जिल्हा परिषदेच्या हद्दीदीतील सर्व गावांमध्ये संध्याकाळी दोन तास टीव्ही आणि मोबाईल बंद राहणार आहेत. मुलांच्या शिक्षणाच्या पार्श्वभूमीवर हा मोठा निर्णय धाराशिव जिल्हा परिषदेने घेतला आहे.

मोबाईल, टीव्ही या वस्तू मनोरंजनाच्या आहेत. पण प्रत्येक जण या वस्तूंच्या आहारी गेलेला बघायला मिळतो. विशेष म्हणजे शालेय विद्यार्थ्यांचा यामध्ये जास्त समावेश आपल्याला बघायला मिळते. पण यामुळे मुलांच्या अभ्यासावर परिणाम होतो. त्यामुळे मुलांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी. त्यांचा कल अभ्यासाकडे वळावा यासाठी धाराशिव जिल्हा परिषदेने सर्व गावांमध्ये संध्याकाळी दोन तास टीव्ही आणि मोबाईल बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. संध्याकाळी सात वाजता ग्रामपंचायत कार्यालयातून भोंगा वाजेल. त्यानंतर पुढचे दोन तास गावात टीव्ही आणि मोबाईलवर बंदी येईल. तसेच सरकारी कर्माचाऱ्यांकडून याबाबत गावात पाळत ठेवली जाईल, अशी देखील माहिती समोर येत आहे.

धाराशिवमध्ये विद्यार्थ्यांचं अभ्यासाकडे लक्ष केंद्रीत करण्यासाठी जिल्हा परिषदेने हा मोठा निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या हद्दीतील गावांमध्ये दररोज संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत टीव्ही आणि मोबाईल बंद ठेवण्याचा निर्णय जिल्हा परिषदेने घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चना पाटील यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे.

# 'महाराष्ट्राच्या राजकारणात आठ दिवसांत मोठा भूकंप होणार', नाना पटोले यांचं भाकीत

**नागपूर (प्रतिनिधी)** –भाजपचा आजवरचा इतिहास पाहिला तर त्यांनी नेहमीच आपल्या मित्रपक्षांना संपवण्याचे काम केले आहे. आताही भाजप आपल्यास मित्रपक्षांवर डाव टाकत असून आगामी आठ दिवसांत राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप बघायला मिळेल, असा मोठा दावा काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केला आहे. नाना पटोले रविवारी (५ एप्रिल) नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी पटोले यांनी पाच राज्यांच्या निवडणूक निकालांपूर्वीच 'ऑपरेशन लोटस' पूर्णत्वास जाणार असल्याचा दावा केला आहे.

अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी मध्यंतरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आणि शिवसेना उद्धव ठाकरे, तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अनेक बडे नेते, आमदार आणि खासदार भाजपच्या संपर्कात असल्याचा दावा केला होता. याबाबत विचारलेल्या प्रश्नावर नाना पटोले यांनी मित्र पक्षांना संपवणे हा भाजपचा इतिहासच असल्याचे सांगितले. भाजप हा इतरांना गिळंकृत करणारा पक्ष आहे. देशभरातील भाजपच्या मित्र पक्षांचे काय झाले यावर नजर टाकल्यास शिंदे सेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे फार काही भवितव्य दिसत नाही. त्यांचे नेते भाजपमध्ये सामील झाल्यास नवल वाटण्याचे कारण नाही, याची सुरुवात झाली आहे. असे झाल्यास राज्यात यापुढे भाजप आणि काँग्रेस हे दोनच पक्ष शिल्लक राहतील, असे नाना पटोले म्हणाले.

# अर्धापुरात बालविवाहप्रकरणी ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**अर्धापूर (प्रतिनिधी)**–तालुक्यातील दाभड शिवारात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे भविष्य अंधारात ढकलण्याचा प्रयत्न अर्धापूर पोलीस आणि सतर्क ग्रामसेवकाने हाणून पाडला आहे. एका 'फार्महाऊस'च्या पाठीमागे शेतात लपून-छपून सुरू असलेला हा विवाह सोहळा पोलिसांनी उधळून लावला असून, या प्रकरणी नवरी मुलीच्या आई- वडिलांसह ८ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याबाबत महिला व बालविकास कार्यालय अनभिज्ञ होते. माहिती मिळाल्यानंतर या विभागातील महिलांनी घटनास्थळाकडे धाव घेतली.

रविवार, दि. ५ एप्रिल रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास दाभड येथील ग्रामसेवक दामोदर मारोतराव गमे यांना मिळालेल्या माहितीनुसार, दाभड शिवारातील एका शेतातील फॉर्महाऊसच्या पाठीमागे गुपचूप लग्नाची तयारी सुरू होती. ही माहिती मिळताच ग्रामसेवकांनी तातडीने



अर्धापूर पोलीस ठाण्याशी संपर्क साधला आणि पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक घटनास्थळी रवाना झाले.

पोलीस आणि प्रशासकीय पथक जेव्हा घटनास्थळी पोहोचले असता एका 'फार्महाऊस'च्या मागे असलेल्या शेतात छोटा मांडव, चटई आदी दिसून आले. लग्नाची विधी सुरू होण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी छापा टाकला. अचानक पोलीस आल्याचे पाहून तिथे उपस्थित असलेल्या वऱ्हाड्यांची मोठी धावपळ उडाली आणि अनेक जण शेतातून पळून गेले. यावेळी घटनास्थळी उपस्थित असलेल्या नवरी मुलीची आणि नवरदेवाच्या वयाची खात्री केली असता, नवरी मुलगी ही केवळ १६ वर्षांची असल्याचे निष्पन्न झाले. ती टेंभी तांडा ता. किनवट येथील रहिवासी असून, तिचा विवाह पाथरी ता. किनवट येथील २१ वर्षीय तरुण अर्जुन सुभाष राठोड याच्याशी लावून दिला जात होता. मुलीचे वय कमी आहे हे माहीत असूनही तिला लग्नासाठी प्रवृत्त केल्याप्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ च्या कलम ९, १० आणि ११ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धरमसींग गोवर्धन भाटी मुलीचे वडील, मुलीची आई रा. टेंभी तांडा, ता. किनवट, चरण सुभाष राठोड, मुलीचे मामा आणि मामी रा. टेंभी तांडा, सुभाष राठोड मुलाचे वडील आणि मुलाची आई रा. पाथरी, ता. किनवट, बालाजी मुलाचा मामा, रा. खडका तांडा, जि. यवतमाळ, ज्याने विवाहासाठी आपली जागा उपलब्ध करून दिली. मुलीचा मावसा नंदलाल बंडु जाधव अशा आठ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

# अर्थ खात्यातील कक्ष अधिकाऱ्यास लाच घेताना रंगेहात अटक

**मुंबई (प्रतिनिधी)** –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाचखोर अधिकाऱ्यांविरुद्ध उघडलेल्या मोहिमेत आता अर्थ आणि नियोजन विभागाचा मासा गळाला लागला आहे. निधी मंजूर करून देण्यासाठी तब्बल ६ लाख ३७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना कक्ष अधिकारी विलास लाड याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खारघर परिसरात रंगेहात अटक केली.


मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामविकास विभागाचा निधी मंजूर करून देण्याच्या बदल्यात विलास लाड याने संबंधित व्यक्तीकडे मोठ्या रकमेची मागणी केली होती. शासकीय कामासाठी अडवणूक करून लाचेची मागणी होत असल्याची तक्रार एसीबीकडे प्राप्त झाली होती. या तक्रारीची दखल घेत एसीबीने सापळा रचला. एसीबीच्या पथकाने नवी मुंबईतील खारघर परिसरात सापळा रचला होता. यावेळी लाचेची रक्कम ६ लाख ३७ हजार रुपये स्वीकारताना विलास लाड याला एसीबीच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले.

# पाकिस्तानी संरक्षण मंत्र्याची भारताला धमकी: पुढचे युद्ध कोलकातापर्यंत पोहोचेल

**इस्लामाबाद (वृत्तसंस्था)** – पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी शनिवारी सियालकोटमध्ये पत्रकारांशी बोलताना भारताला धमकी दिली आहे. जर भारताने कोणतेही फॉल्स फ्लॅग ऑपरेशन केले, तर यावेळी संघर्ष केवळ सीमेपुरता मर्यादित राहणार नाही, तर तो कोलकातापर्यंत पोहोचू शकतो.

ख्वाजा आसिफ यांनी दावा केला की, भारत आपल्या लोकांचा किंवा ताब्यात असलेल्या पाकिस्तानींचा वापर करून खोटे नाटक रचण्याची योजना आखत आहे. मृतदेह कुठेतरी ठेवून दहशतवादाचा आरोप पाकिस्तानवर लावला जाऊ शकतो. परंतु त्यांनी या दाव्यासाठी कोणताही पुरावा दिला नाही. ख्वाजा आसिफ पुढे म्हणाले की, गेल्या वर्षीप्रमाणे यावेळी भारताला आणखी जास्त लाजिरवाण्या परिस्थितीचा सामना करावा लागेल.

ख्वाजा आसिफ यांच्या या विधानावर भारताकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केरळममधील एका कार्यक्रमात पाकिस्तानला स्पष्ट इशारा दिला होता. जर पाकिस्तानने पुन्हा कोणतीही चुकीची पाऊल उचलली तर भारतीय सेना निर्णायक प्रत्युत्तर देईल.




# ओडिशात भूकंपाचे धक्के

**ओडिशा (वृत्तसंस्था)** – ओडिशाच्या कोरापुट जिल्ह्यात शनिवारी रात्री उशिरा भूकंप झाला, ज्यामुळे सर्वत्र घबराट पसरली. रात्री सुमारे ११:३० वाजता झालेल्या या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.४ होती. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्रानुसार, भूकंपाचा केंद्रबिंदू जयपूरजवळ होता. तो जमिनीखाली अंदाजे ५ किलोमीटर खोल होता. कमी खोलीमुळे भूकंपाचे धक्के अधिक स्पष्टपणे जाणवले.

दरम्यान, भूकंपाचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून, त्यात भूकंपाच्या धक्क्यांचा परिणाम स्पष्टपणे दिसत आहे. व्हिडिओमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा काही सेकंदांसाठी हादरताना दिसत आहे. भूकंपाचे धक्के जाणवताच लोक घाबरून आपापल्या घरातून बाहेर पळताना दिसत आहेत. कोरापुट, जयपूर, लामतापुट, सुनाबेदा, बोरिगुमा, सेमिलिगुडा, नंदपूर, पोट्टांगी आणि दमनजोडी यासह अनेक भागांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले.

# चार तरुणांचा दुर्दैवी मृत्यू

## छत्रपती संभाजीनगरमधील हृदयद्रावक घटना

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – वाढत्या उन्हाचा तडाखा आणि रविवारची सुट्टी असा दुग्धशर्करा योग साधून हर्सूल तलावात पोहण्यासाठी गेलेल्या चार तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. सुट्टीचा आनंद घेण्यासाठी गेलेल्या या तरुणांवर काळाने झडप घातल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उन्हाळ्यामुळे अंगाची लाहीलाही होत असल्याने गारवा मिळवण्यासाठी हे तरुण हर्सूल तलावावर पोहण्यासाठी गेले होते. सुरुवातीला तीन मुले तलावात बुडाल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. घटनेचे गांभीर्य ओळखून बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तासाभराच्या अथक परिश्रमानंतर पथकाने तिघांचे मृतदेह पाण्याबाहेर काढले. मात्र, तलावाच्या दुसऱ्या बाजूला आणखी एक तरुण बुडाल्याची माहिती समोर आल्यानंतर पुन्हा शोधमोहीम राबवण्यात आली, ज्यामध्ये चौथ्या तरुणाचाही मृतदेह हाती लागला.

या दुर्दैवी घटनेत प्राण गमावलेल्यांपैकी अफान खान आणि आदिल शेख अशी दोघांची नावे निष्पन्न झाली आहेत. उर्वरित दोन तरुणांची ओळख पटवण्याचे काम प्रशासनाकडून युद्धपातळीवर




सुरू आहे. पोलिसांनी चारही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय घाटी रुग्णालयात पाठवले आहेत. उन्हाळ्याच्या सुट्टीत जलसाठ्यांवर पोहण्यासाठी तरुणांची मोठी गर्दी होत असते, मात्र सुरक्षेचा अभाव आणि पाण्याचा अंदाज न आल्याने अशा दुर्घटना घडत आहेत. रविवारची ही सुट्टी या चार तरुणांच्या आयुष्यातील शेवटची सुट्टी ठरल्याने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हर्सूल पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, नागरिकांनी अनोळखी जलसाठ्यांमध्ये पोहताना काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वे १० पदरी होणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – वाढत्या वाहतुकीमुळे कायम कोंडीचा सामना करणाऱ्या मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर आता मोठा बदल होणार आहे. मागेच घाटात एक प्रोपोलिन गॅसने भरलेला टेम्पो उलटला होता. त्यामुळे प्रचंड ट्रॅफिक झाले आणि नागरिकांना तिकडेच २ दिवस अडकून राहावे लागले. अनेक पर्यायी मार्गांचा शोध घेत नागरिकांनी आपली सुटका करून घेतली, अशी परिस्थिती पुन्हा उदभवू नये म्हणून सरकारने हा महत्वाचा निर्णय घेतला आहे.

महामार्गाचे १० पदरीकरण करण्याचा महत्त्वाचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने घेतला असून, यामुळे प्रवास अधिक वेगवान आणि सुरक्षित होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम येत्या पावसाळ्यानंतर सुरू होणार



आहे. टप्प्याटप्प्याने काम पूर्ण करीत पुढील ३ वर्षांत, म्हणजेच २०२९-३० पर्यंत संपूर्ण विस्तार पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. सध्या असलेल्या मार्गावर वाढत्या वाहनसंख्येमुळे निर्माण होणारी कोंडी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर निधी लागणार असून, तो वित्तीय संस्थांकडून कर्जाच्या माध्यमातून उभारला जाणार आहे. या कर्जाची परतफेड करण्यासाठी सध्याच्या टोल वसुलीची मुदत १५ वर्षांनी वाढवण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे आता या मार्गावर टोल वसुली २०४५ ऐवजी २०६० पर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकल जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

**संपादक**
**केशव घोणसे पाटील**


# कृत्रिम बुद्धिमत्ता: अस्वस्थ वास्तव

बंगळुरूमधील एका तंत्रज्ञाने दीर्घकाळ बेरोजगारी आणि मानसिक तणावाला कंटाळून आत्महत्या केली. ही अलीकडील घटना केवळ एक वैयक्तिक शोकांतिका नाही, तर आयटी क्षेत्रातील वेगाने बदलणाऱ्या वास्तवाचे धक्कादायक चित्र आहे. आकडेवारी, बाजारपेठेतील विश्लेषण आणि तांत्रिक प्रगतीच्या चर्चेपलीकडे जाऊन पाहिले, तर ही घटना मानवी आयुष्यांवर होत असलेल्या परिणामांची जाणीव करून देते. स्वप्ने तुटणे, ओळख पुसट होणे आणि मानसिक स्थैर्य कोलमडणे, ही आज अनेक उच्चशिक्षित व्यावसायिकांची अव्यक्त वेदना बनत चालल्याचे दिसत आहे. पूर्वी नोकरी गमावणे म्हणजे तात्पुरती अडचण मानली जात होती. परंतु आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय आणि स्वयंचलित यंत्रणेच्या वाढत्या प्रभावामुळे, ही परिस्थिती अनेकांसाठी अस्तित्त्वाचा प्रश्न ठरत आहे. जागतिक पातळीवर करिअर घडवलेले, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवलेले व्यावसायिक अचानक बेरोजगारीच्या गर्तेत सापडतात, तेव्हा त्यांच्या आत्मविश्वासाला मोठा धक्का बसतो. कुटुंबियांच्या अपेक्षा, आर्थिक जबाबदाऱ्या आणि अनिश्चित भविष्य यांचा एकत्रित परिणाम मानसिक तणाव अधिक तीव्र करतो. तांत्रिक बदल किंवा उदासीनता ही संज्ञा धोरणात्मक भाषेत सहज वापरली जाते. मात्र तिच्या आड लपलेला मानवी वेदनेचा पैलू अनेकदा दुर्लक्षित राहतो. विशेषतः मध्यम अनुभव असलेले व्यावसायिक सर्वाधिक अडचणीत सापडतात. परदेशातून परतलेले किंवा दीर्घ अनुभव असलेले कर्मचारी नव्या कौशल्यांच्या मागण्या पूर्ण करण्यात अपयशी ठरतात, तर नव्या नोकऱ्यांसाठी ते अतिपात्र ठरतात. अनेक ठिकाणी उच्च गुणवत्ता असलेल्या लोकांना कनिष्ठ पदावर नेमणूक दिली जात नाही, त्याचे हे उदाहरण आहे. अशा परिस्थितीत त्यांच्यासमोर पर्याय अत्यंत मर्यादित राहतात. याहूनही चिंताजनक बाब म्हणजे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या नोकरकपातीचे अपरिहार्य परिणाम म्हणून होत असलेले सामान्यीकरण. भारतातील आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांची कपात होत असल्याच्या बातम्या, त्या कितीही वादग्रस्त असल्या तरी, कामगारवर्गात भीती आणि असुरक्षिततेची भावना निर्माण करतात. यामध्ये सर्वात मोठी उणीव जाणवते ती म्हणजे सक्षम कौशल्य यंत्रणांचा अभाव आणि मानसिक आरोग्यासाठी संस्थात्मक पातळीवर असलेला अपुरा आधार. मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांनी केवळ नफ्यावर लक्ष केंद्रित न करता, आपल्या कर्मचाऱ्यांप्रती असलेली सामाजिक जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. पण असे होत नाही. नफेखोरीला चटावलेल्या ह्या कंपन्या कोणत्याही नियमाचे पालन करीत नाहीत, हा आजवरचा अनुभव आहे. म्हणूनच अशा लोकांसाठी पारदर्शक संवाद, योग्य आर्थिक भरपाई आणि नव्या कौशल्यांच्या प्रशिक्षणासाठी ठोस योजना या गोष्टी ऐच्छिक नसून अनिवार्य असायला हव्यात. कारण तंत्रज्ञानामुळे होणाऱ्या बदलांना मानवी चेहरा देणे ही काळाची गरज आहे. त्याचप्रमाणे शासनाच्या धोरणकर्त्यांनीही या बदलांकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. आतापर्यंत असंघटित क्षेत्रातील रोजगार समस्यांकडे ज्या तातडीने लक्ष दिले गेले त्याच तीव्रतेने पांढरपेशा क्षेत्रातील, विशेषतः माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील, अस्थिरतेकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. कारण मानसिक आरोग्य हा विषय अजूनही कामाच्या ठिकाणी दुय्यम मानला जातो. मात्र तो केंद्रस्थानी आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. समुपदेशन सेवा, जनजागृती मोहिमा आणि मानसिक तणावाबाबतचे कलंक निर्मूलन हे उपाय तातडीने राबवणे आवश्यक आहे. कुटुंबीय आणि समाज यांची भूमिकाही येथे तितकीच महत्त्वाची ठरते. तणावाची लक्षणे ओळखणे, वेळेवर आधार देणे आणि संवाद कायम ठेवणे यामुळे अनेक गंभीर घटना टाळता येऊ शकतात. म्हणूनच कुटुंबामध्ये संवाद असणे हे आत्महत्येसारख्या टोकाच्या निर्णयांपर्यंत परिस्थिती पोहोचण्यापूर्वी हस्तक्षेप करणे यासाठी आवश्यक आहे, नव्हे ती सामूहिक जबाबदारी आहे. ही घटना केवळ एक अपवाद नाही, तर एक गंभीर इशारा आहे. भारत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जागतिक स्पर्धेत आघाडी घेण्याचा प्रयत्न करत असताना विकासाची दिशा आणि त्याचे परिणाम यांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. प्रगतीचा अर्थ फक्त आर्थिक वाढ नसून, ती सर्वसमावेशक आणि मानवी मूल्यांना जपणारी असायला हवी. जे लोक या प्रगतीचे आधारस्तंभ होते, त्यांनाच मागे टाकून मिळवलेली वाढ कितपत अर्थपूर्ण आहे, हा प्रश्न आज समाजासमोर उभा आहे.

# द्वेष म्हणजे अधोगतीचे मूळ कारण!



महाभारताने आपणाला भाऊबंदकी दाखविली आहे. भावाभावांमध्ये असणारे वाद कसे निर्माण होतात. भाऊबंदकी काय असते? याची माहिती महाभारत सरळ रीतीने मनुष्याला जीवन जगण्यास सांगते.

अर्जुन आणि कर्ण यांच्याविषयी काही गोष्टी आपल्याला या लेखात पाहायचे आहेत. कर्ण हा शूर होता तसाच अर्जुनही शूर होता. दुर्योधन नेहमी अर्जुनाचा तिरस्कार करत असे. अर्जुनाला सुईच्या टोकावर बसेल एवढीसुद्धा जमीन आम्ही देणार नाही, असे कौरवाने शपथ घेतली होती. कौरव हे शंभर होते तर पांडव हे पाचच होते. तरीही शेवटपर्यंत दुर्योधन संतुष्ट झाला नाही. अनेक पद्धतीने पांडवाचा त्यांनी कर्णालासोबत घेऊन द्वेष केला. दुर्योधनाला काय मिळाले या द्वेषातून? शेवटी दुःख वाट्याला आले.

आयुष्यभर द्वेषामुळे दुर्योधनाला अधोगतीकडे जाण्याची वेळ आली. हे सत्य आपण विसरू शकत नाही, म्हणून तिरस्कार हा मानवाला अधोगतीकडे घेऊन जातो. सध्या जगामध्ये एकमेकांबद्दल अनेक ठिकाणचे उदाहरण आहेत. एखादा देश पुढे जात असेल तर दुसरा देश कुरघोडी करून त्या देशाचा तिरस्कार करून त्याच्यावर आक्रमण करतो. आपल्यापेक्षा पुढे जाऊ देत नाही. कोणत्याही पद्धतीने त्याला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करतो हे सगळं द्वेषामधून घडते. ही मानवासाठी चांगली गोष्ट नाही. तिरस्कार करणे हा काही माणसाचा स्वभाव असतो.

आपल्याच हातून सगळं कार्य घडावं. गावात, जिल्ह्यात, राज्यात आपणांस मोठे म्हणावं. बाकीच्यांना म्हणू नये. म्हणून काही माणसं इतरांचा तिरस्कार करतात. सगळीकडे आपणच टेंभा मिरवावा असे त्यांना वाटते. निवडणुकीमध्ये सुद्धा आपणच विजयी व्हावे. सगळीकडे माझाच झेंडा असावा अशी मनामध्ये खूनगाठ बांधून इतरांना त्रास देतात ते फक्त तिरस्कारामुळेच, एकमेकांमध्ये भेदाभेद करतात.

आपण राज्यकर्ते आहोत. इतरांनी फक्त आपले गुलाम बनावेत. इतरांना आपल्या संतरज्या उचलायला लावावेत असे म्हणून इतरांना त्रास देण्यातच धन्यता मानतात हे सगळं चांगलं नाही. वर्णपद्धती समाजात निर्माण झाली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र एकमेकांबद्दल तिरस्कार निर्माण झाला. तिरस्कारामुळे मानव मानवाला तुच्छ लेखायला लागला, म्हणून तिरस्कार ही गोष्ट पूर्वी-पासूनच भारतात आहे. इंग्रजांनाही वाटत असे आम्ही गोरे आहोत.

आम्हाला चांगला सन्मान पाहिजे, इतरांना नको, सर्वत्र आमचा दबदबा असावा. पगार आम्हाला जास्त असावा. तिरस्कार कोणी कोणाचा करावा. आपल्या बरोबरीच्याचा करावा की लहानांचा करावा हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. एखादा खूप मोठा होत असेल तर तिरस्कार त्याचा आपण काय म्हणून करावा. आपण सुद्धा कष्ट करावेत. मोठे व्हावेत ही मानसिकता जोपर्यंत आपल्यात रुजत नाही तो पर्यंत तिरस्कार मनातून जात नाही. एखाद्याने गाडी, बंगला घेतला आपणासही तसेच हवे असे वाटत असेल तर अहोरात्र कष्ट करावे लागतात. तेव्हा कष्टाला फळ मिळते, परंतु आपण उनाडक्या करत हिंडायचे? भटकत राहायचं? कोणालाही पैसे मागायचे? नाही दिले की तिरस्कार करायचा? हे कधी शहाणी झाले आमच्या पुढे? असे होते, तसे होते अशी गरळ ओकायची आणि तिरस्कार करायचा हे सर्व सोडून द्यावे आणि जोमाने आपणही अहोरात्र अभ्यास करून शिक्षण शिकून बरोबरी करावे. तेव्हा तिरस्कार कमी होईल असे वाटते.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा तिरस्कार काही लोकांनी केला तेव्हा ते डगमगले नाहीत. त्यांनी शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचली, आणि आज ते सूर्याएवढे मोठे झाले याला मानवता वाद म्हणतात. तिरस्कारामुळे अजूनही कोणाचे बरे झाले नाही. तिरस्कारामुळे वादविवाद वाढत जातात, म्हणून मित्रांनो लांब लांब जटा वाढवून देवानंद होण्यापेक्षा बुद्धी वाढवून स्वामी विवेकानंद बना, गुलाबाचे फुल फार सुंदर दिसते परंतु खाली त्याला काटे असतात तेही स्वीकारावे लागतात. जीवन हे अनमोल रत्न आहे. तिरस्कार करून ते नावारूपाला येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कधीच कोणाचा तिरस्कार केला नाही. मानवाला त्यांनी मानव म्हणून उभे केले आणि घटनेचे शिल्पकार झाले. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींनी कधीही एकही ओवी ज्ञानेश्वरीमध्ये तिरस्काराची लिहिली नाही. जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात ।। म्हणून तिरस्कार करू नका, असे म्हटले. जगद्गुरु तुकाराम महाराजांचा तिरस्कार अनेक लोकांनी केला.

तरीही त्यांनी आपलं कार्य सोडलं नाही. शेवटी लोक त्यांना शरण आले तुम्ही कोण आहात? हे आम्हाला सांगा म्हणाले. शिशुपाल श्रीकृष्णाचा नेहमी तिरस्कार करायचा, श्रीकृष्णाने शांत चित्ताने शंभर अपराध माफ केले हे आपण जाणतोच म्हणून कोणी कोणाचा तिरस्कार करू नका.

शकुनी मामाने आयुष्यात कोणतीही गोष्ट चांगली केली नाही. काय मिळवलं शेवटी शकुनी मामानी अपकीर्ती, अपमान, शकुनी मामां कूटकारस्थान करण्यात तरबेज होते, त्यामुळे कंस मामा, शकुनी मामा हे वाईट वागले, पहा बरे हंबीरराव मोहिते हे मराठ्याचे सरसेनापती होते, खराखरच ते बलाढ्य वीर होते, खरे- खोटे जाणणारे ते शूर व्यक्ती होते, त्यांनी कधीही कोणाचा तिरस्कार केला नाही म्हणून ते मराठ्यांच्या इतिहासात आजरामर झाले. रामायणामध्ये कैकयीने इतरांचा तिरस्कार केला त्यामुळे आज ती लयाला गेली. रामायण एवढे गाजले परंतु म्हणावा तसा मान कैकयीला मिळाला नाही .रामायण वाचून करोडो लोक सुधारले परंतु कैकयी सुधारली नाही. फक्त तिरस्कारामुळे.... हिटलरने ज्यूचा तिरस्कार केला .

शेवटी त्याला एक दिवशी फाशी घ्यावी लागली हे सत्य आहे.एखाद्याचा मुलगा नोकरीला लागला की इतरांनी तिरस्कार करू नये, त्यांनी पैसे भरून लावली असेल ! एवढा शाहाणा झाला काय डअसे बोलतात, काही लोक कंपन्या बदलतात तरी लोक नाव ठेवतात,अपमान केला जातो मग माणूस त्याचा बदला घेण्यासाठी आपण दुसऱ्याचा तिरस्कार करतो अशी साखळी बनत जाते आणि त्याचा शेवट वाईटच होतो ,म्हणून कोणीही कोणाचा तिरस्कार करू नये, सध्या प्रसार माध्यमावर काही नृत्यांगना नृत्य करीत आहेत, त्यामुळे त्याची चर्चा चालू आहे,बाबा लोक छान कीर्तन करत आहेत, त्यांचा इतर लोक तिरस्कार करतात,त्यांची प्रसिद्धी इतरांना पाहू वाटत नाही. त्यामुळे आपण स्वतः एखादे वेगळं कार्य करावं. तेव्हा प्रसिद्धी मिळेल .म्हणून इतरांचा तिरस्कार न करता आदर करा.


**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
संस्थापक अध्यक्ष:
विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी
ता.मुखेड जि. नांदेड


# इच्छाशक्ती आणि जिज्ञासू वृत्ती हाच यशाचा खरा मार्ग



शिक्षण हा सहज भाव आहे. प्रत्येक व्यक्तीचे सातत्याने शिक्षण चालू असते. परिसरातील प्रत्येक घटकांपासून आणि घडणाऱ्या प्रत्येक घटनेमधून माणूस शिकत असतो. थोडक्यात अनौपचारिक पद्धतीने कळत-नकळत शिक्षण प्रक्रिया अखंडपणे सुरू असते. ज्याप्रमाणे ग. दि. मांडगूळकर आपल्या गीतात म्हणतात-

बिन भिंतीची उघडी शाळा
लाखो इथले गुरू
झाडे, वेली, पशु, पाखरे
यांशी गोष्टी करू
बघू बंगला या मुंग्यांचा,
सूर ऐकुया त्या भुंग्यांचा,
फुलाफुलांचे रंग दाखवील
फिरते फुलपाखरू

याप्रमाणे अनौपचारिक शिक्षण विविध मार्गाने प्रत्येक प्रसंगी सुरू राहते. औपचारिक शिक्षणाचा विचार करता याची सुरुवात अंगणवाडीपासून होते. पुढे बालक शाळेत शिकायला लागते. यामुळे औपचारिक शिक्षणाची सुरुवात आणि पायाभरणी शाळेत होत असते. ही शिक्षण प्रक्रिया नियोजनबद्ध पद्धतीने ठराविक आकृतीबंधात सुरू असते. दिवसेंदिवस या औपचारिक शिक्षण पद्धतीमध्ये खूप बदल आणि परिणामकारक सुधारणा होत असल्याचे दिसून येत आहे. त्यातही शिक्षण हक्क कायदा आल्यापासून खूप मोठे बदल झालेले आहेत. अभ्यासक्रम आराखडा, पाठ्यक्रम सरंचना, अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापन प्रक्रिया यामध्ये तर बदल झाले आहेतच; यासोबत परिसर, पालक, शिक्षण पूरक साहित्य एकूणच शिक्षणावर परिणाम करणाऱ्या सर्वच घटकांमध्ये अमुलाग्र बदल आणि सुधारणा झाल्याचे स्पष्टपणे जाणवते.

पूर्वीच्या काळाचा विचार केला तर शाळा आणि शिक्षकांशिवाय इतर विश्वसनीय मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध नव्हते. शाळेत शिकवलेल्या अभ्यासाची उजळणी आणि दिलेला गृहपाठ पूर्ण करून घेण्यासाठी स्वतः पालकांना लक्ष द्यावे लागत असे. अभ्यासाकडे लक्ष देताना अभ्यासाच्या संदर्भाने पालकांना स्वतःला तयार करून घ्यावे लागायचे. त्यासाठी अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तके याचा अभ्यास करावा लागायचा. तेव्हा कुठे विद्यार्थ्यांना शाळेव्यतिरिक्त आवश्यक शैक्षणिक मदत मिळायची. त्यातही कमी शिकलेले आणि अशिक्षित असणारे पालक नेहमीच भांबावून जायचे. शिकवणीचा पर्याय उपलब्ध होता, परंतु तो सर्वच पालकांना परवडेल असा नव्हता. त्यामुळे शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या विकासपूर्वीचा काळ शिक्षण घेण्यासाठी अवघड होता.

आता मात्र शिकणे सर्वार्थाने सोपे झाले आहे. आता इच्छाशक्ती असणाऱ्या प्रत्येक माणसाला विविध क्षेत्रातील ज्ञान मिळविण्यासाठी, शिकण्यासाठी आणि समृद्ध होण्यासाठी अनेक मार्ग, प्रचंड साहित्य आणि अनेक संदर्भ उपलब्ध आहेत. यासोबतच विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण घेणे सुद्धा खूप सोपे झाले आहे. सध्या दोन-तीन वर्षांच्या अगदी लहान बालकांपासून ते उच्च शिक्षण घेणाऱ्या युवकांपर्यंत शिक्षणाची विविध माध्यमं, सामग्री आणि साधने उपलब्ध आहेत.

लहानग्या बालचिमुकल्यांचा विचार केला तर प्राणी, पक्षी, फुले, फळे, रंग, वार, महिने, दिशा, ऋतू, अक्षर, अंक यांसारख्या मूलभूत बाबींची परिपूर्ण ओळख होण्यासाठी अनेक शैक्षणिक व्हीडीओ, मोबाईल ॲप्स, सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत. विविध मोबाईल ॲप्सवर विद्यार्थ्यांकडून वाचन, लेखनाचा सराव करून घेता येतो. मनोरंजक पद्धतीने जोड्या लावा, वर्गीकरण करा, सूचनेप्रमाणे कृती करा यासारख्या असंख्य प्रात्यक्षिके आणि कृती करून अध्ययन घटकाचे दृढीकरण करण्यासाठी शैक्षणिक ॲप्स, सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत. असंख्य दर्जेदार शैक्षणिक व्हीडीओ विविध माध्यमावर उपलब्ध आहेत.

उदाहरण घ्यायचे झाले तर आजच्या काळात इंग्रजी विषय शिकण्यासाठी असंख्य शैक्षणिक व्हीडीओ उपलब्ध आहेत. यासोबत किड्स प्रायमर, बोलो, स्पीकिंग इंग्लिश, रीड टू मी यासारखी कितीतरी मोबाईल ॲप्स आणि सॉफ्टवेअर सुद्धा उपलब्ध आहेत. रीड टू मी सारख्या ॲप्लीकेशनमध्ये प्रत्येक अक्षराचे, शब्दाचे, वाक्याचे आणि परिच्छेदाचे वाचन सुलभ पद्धतीने शिकता येते. शब्दांचा मराठी आणि इंग्रजी अर्थ, योग्य उच्चार हे ही शिकता येते. समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, शब्द संपत्ती वाढविण्यासाठीचे कृती, उपक्रम यासारख्या अनेक सुविधा यामध्ये आहेत. अध्ययनास मदत करणाऱ्या अशा ॲप्स आणि सॉफ्टवेअर बद्दल जेवढे लिहावे तेवढे कमीच आहे. असे भरपूर ॲप्स, सॉफ्टवेअर आणि शैक्षणिक व्हीडीओ आहेत.


आता जर तुम्हांला शिकण्याची इच्छा असेल तर तुम्ही कोणत्याही वेळी कुठल्याही विषयाचे ज्ञान मोफत मिळवू शकता. यूट्यूबवर असंख्य शैक्षणिक व्हीडीओ आहेत. विविध क्षेत्रातील प्रत्येक विषयावर, घटकावर, संकल्पनेवर असंख्य मार्गदर्शक शैक्षणिक व्हीडीओ पाहण्यासाठी, सरावासाठी आणि दृढीकरणासाठी उपलब्ध आहेत. युट्युब, गुगल, विविध शैक्षणिक ॲप्स आणि सॉफ्टवेअर तुमचे समग्र क्षेत्रातील शिकणे समृद्ध करू शकते. यासाठी मात्र तुम्हाला या नवीन तंत्रज्ञानाची ओळख असणे गरजेचे आहे. मोबाईल, संगणक, इंटरनेट यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणासाठी कसा उपयोग करावा याविषयी सुद्धा अनेक प्रकारची माहिती उपलब्ध आहे. गरज आहे फक्त आपल्या इच्छाशक्तीची आणि जिज्ञासू वृत्तीची.

आता फक्त बालकांचे वाचन, लेखन, संख्याज्ञान, संख्येवरील मूलभूत क्रिया यासारख्या अध्ययन संसाधन बळकट करणे गरजेचे आहे. पुस्तके आणि इतर असंख्य माध्यमातून कसे शिकावे...? हे बालकांना समजावून सांगण्याची गरज आहे. यासाठी पालकांनी आणि शिक्षकांनी आपला शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन काळानुरूप बदलणे गरजेचे आहे. मुलांना शिकवण्यापेक्षा त्यांनी स्वयं प्रयत्नांनी कसे शिकावे हे शिकवणे गरजेचे आहे. एकदा शिकण्याची कला कळल्यावर बालके स्वयंप्रेरणेने आणि स्वतःच्या प्रयत्नाने खूप काही शिकतात. तरीही एक नोंद करणे खूप महत्त्वाचे वाटते. कोरोना काळात शाळा आणि शिक्षकांचे महत्त्व प्रकर्षाने अधोरेखित झाले आहे. शिक्षकाला पर्याय असूच शकत नाही. शिक्षकांनी व पालकांनी मात्र आता खऱ्या अर्थाने सुविधादाता आणि दिशादर्शक बनले पाहिजे. आजच्या तंत्रज्ञानाच्या काळात शिकण्यासाठी आधुनिक उपलब्ध सर्व माध्यमांचा आणि साहित्याचा उपयोग खऱ्या अर्थाने आपले शिकणे सोपे करणार आहे. अट मात्र एवढीच आहे प्रत्येक साधनाचा चांगल्या गोष्टीसाठी आणि योग्य मर्यादेत उपयोग झाला पाहिजे.

प्रश्न मला पडणारे मी मलाच
विचारत आहे आता
उत्तरे त्या प्रश्नांची मी स्वतःच
शोधत आहे आता...
मी शिकतो नव्या प्रयत्नांनी
मी आनंदात आहे आता
येताच समस्या मजला मी स्वतःच
सोडवत आहे आता....


**-मयूर मधुकरराव जोशी**
विठ्ठल रुक्मिणी नगर, जिंतूर.
जि. परभणी.
९७६७७३३५६०


# फास्टफुडमुळे वाढतोय कर्करोगाचा धोका



सध्या मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे. कॅन्सर सारख्या जीवघेण्या आणि असाध्य आजाराचे प्रमाण मुलांमध्ये वाढण्याचे कारण शोधण्यासाठी संशोधकांनी संशोधन केले. या संशोधनाचा अहवाल बमेडमध्ये प्रकाशित करण्यात आला. या अहवालात मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढण्यास फास्टफुडला जबाबदार धरण्यात आले आहे. संशोधकांनी असा दावा केला आहे की फास्टफुडमुळेच मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. हा अहवाल मुलांसह पालकांच्याही डोळ्यात अंजन घालणारा आहे.

आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात.

अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. काही वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत.

पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे.

अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजार होऊ शकतो हे आता संशोधनानेच सिद्ध झाले आहे त्यामुळे आतातरी पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.


**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# रणजितसिंघ खूनप्रकरणी दोन आरोपी अटकेत



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील ई-स्क्वेअर डी मार्ट परिसरातील तिहेरी खुनाची घटना ताजी असतानाच शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी मध्यरात्री जुना मोंढा भागात असलेल्या मुरमुरा गल्लीत आणखी एकाचा खून झाला. धारदार शस्त्राने वार करीत ३५ वर्षीय युवकाची हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणात दोन आरोपींना पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी अटक केली आहे.

शुक्रवारी मध्यरात्री नांदेड तीन खुनांनी हादरले होते. ई-स्क्वेअर भागात एका तरुणाची चाकूने वार करून हत्या करण्यात आली होती. या हल्ल्यात जखमी झालेल्या एकाला विष्णुपुरी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले होते. रुग्णालयात भरती करण्यात येत असताना हल्लेखोरांनी जखमीची हत्या केली होती. ही घटना ताजी असतानाच शनिवारी मध्यरात्री मुरमुरागल्ली परिसरात जुन्या वादामधून रणजितसिंग तबेलेवाले उर्फ रज्जा (वय ३५) याच्यावर दोन हल्लेखोरांनी तलवारीने वार केले. या घटनेनंतर आरोपी पसार झाले होते.

वजिराबादचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम हे घटनास्थळी पोहोचल्यानंतर त्यांनी जखमी रणजितसिंगला रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. घटनेचे वृत्त कळताच पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने व त्यांचे सहकारी घटनास्थळी पोहोचले. घटनेचा पंचनामा करून अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. रविवार, दि. ५ एप्रिल रोजी पहाटे यातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली.

वजिराबादचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार मुरमुरा गल्लीतील रणजितसिंह तबेलेवाले याच्या खुनाच्या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. मनप्रितसिंग परविंदरसिंग काचवाले (वय २३) आणि परमज्योतसिंग परविंदरसिंग काचवाले (वय २५, दोघेही रा. अबचलनगर, नांदेड) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक उमाकांत पुणे करत आहेत.

# एन.ई.एस. सायन्स कॉलेजमध्ये जलसाक्षरतेचा जागर




**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील एन.ई.एस. सायन्स कॉलेजमधील भूशास्त्र विभागाच्या वतीने 'जागतिक जल दिन' निमित्त विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि जलसाक्षरता निर्माण करण्यासाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा नुकत्याच पार पडल्या.

सामाजिक कार्यासाठी पाणी या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात महाविद्यालयातील विविध शाखांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. भूशास्त्र विभागाचे अधिव्याख्याते तथा स्पर्धेचे समन्वयक प्रा. आकाश करंडे यांनी या कार्यक्रमाचे तांत्रिक व रचनात्मक नियोजन केले, तर विभाग प्रमुख डॉ. गायकवाड आणि प्रा. एकनाथ खिल्लारे यांनी या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शन केले.

या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे अध्यक्षस्थानी तर नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सदस्य कॉ. प्रदीप नागापूरकर, उपप्राचार्य एकनाथ खिल्लारे, भूशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गायकवाड, प्रा. डॉ. मराठे, प्रा. डॉ. जाधव, प्रा. करंडे आणि प्रा. चोंडे यांची उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना प्रमाणपत्र व बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये सादिया नुसरत हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर द्वितीय क्रमांक सतीश मोखेडे व पूर्वा सुरोशे यांनी विभागून मिळवला. तृतीय क्रमांकाचे मानकरी वैभव वाघमारे व सईदा अतयाब हे ठरले. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. केवळ पारितोषिक मिळवणे हा या स्पर्धेचा उद्देश नसून, विजयी विद्यार्थ्यांनी भविष्यात समाजासाठी खऱ्या अर्थाने 'जलदूत' म्हणून काम करावे आणि जलसंधारणाचा संदेश घराघरांत पोहोचवावा, अशी आग्रही भावना त्यांनी यावेळी अधोरेखित केली. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर डिजिटल ई-प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. प्रा. आकाश करंडे आणि डॉ. किशोर गायकवाड यांच्यामुळे हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडला, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जलजागृतीचा एक नवीन संदेश पोहोचला असल्याच्या प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केल्या.

# विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत व्यावहारिक ज्ञान गरजेचे -सविता कंठेवाड



**नांदेड (प्रतिनिधी)** – एकलव्य इंटरनॅशनल शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय जीवनासोबतच व्यावहारिक ज्ञान देखील मिळावे, या हेतूने मारोतीराव कंठेवाड यांच्या संकल्पनेतून आनंदनगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांनी ६० स्टॉल उभारले होते. दिवसभरात विविध पदार्थांच्या विक्रीतून भरपूर रुपयांची कमाई केली. सौ. सविता कंठेवाड, प्राचार्य रविद्रंन यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणसोबत व्यावहारिक ज्ञान मिळणे देखील गरजेचे असते, असे प्रतिपादन सविता कंठेवाड केले.

विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यवसाय कसा करावा लागतो व त्यातून दोन पैसे मिळविताना कशाप्रकारे अडचणीला तोंड द्यावे लागते, याचा अनुभव यावा म्हणून विद्यालयात आनंद नगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात शाळेतील तब्बल १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवीत, आपली कला सादर करण्याचा प्रयत्न केला.

आनंदनगरीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी घरुनच साहित्य बनवून आणून शालेय आवारात स्टॉल लावले. खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांना विद्यार्थी आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत होते. यावेळी प्रमुख अतिथी यांच्या हस्ते शालेय क्रीडा क्षेत्रात यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या मेळाव्याला एक प्रकारे बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले होते. आनंदनगरीचा आनंद घेण्यासाठी विद्यार्थी व पालकांनी गर्दी केली होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# धारदार तलवारीसह युवक जेरबंद



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** –अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेत कुंडलवाडी पोलिसांनी प्रतिबंधित धारदार तलवारीसह एका युवकाला जेरबंद केले.

मिळालेल्या माहितीनुसार ४ एप्रिल रोजी दुपारी महालक्ष्मी मंदिर परिसरात एक संशयित इसम धारदार शस्त्रासह फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्या नेतृत्त्वाखालील पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत संशयिताला ताब्यात घेतले.

पंचांच्या उपस्थितीत झडती घेतली असता त्याच्याकडून सुमारे ३२ इंच लांबीची लोखंडी तलवार, तिची म्यान आणि मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या तलवारीची किंमत ६५०० रुपये असल्याचे सांगण्यात आले. तसेच १० हजार रुपये किमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून, अटक करण्यात आलेला आरोपी हर्ष उर्फ हर्षसिंग हणमंत इंगळे (वय १९, रा. इंदिरानगर, ता. तरोडा बु., जि. नांदेड) हा असून, तो विनापरवाना प्रतिबंधित शस्त्र बाळगून संशयित हालचाली करत असल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी कुंडलवाडी पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ४२५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

# हुजूर साहिब नांदेड-हजरत निजामुद्दीन-हुजूर साहिब नांदेड दरम्यान साप्ताहिक उन्हाळी विशेष गाडीच्या १६ फेऱ्या

**नांदेड (प्रतिनिधी)**–उन्हाळी हंगामात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने हुजूर साहिब नांदेड – हजरत निजामुद्दीन –हुजूर साहिब नांदेड दरम्यान १६ साप्ताहिक उन्हाळी विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार गाडी क्र. ०७६२१ हुजूर साहिब नांदेड हजरत निजामुद्दीन साप्ताहिक विशेष ही गाडी ११ एप्रिल २०२६ ते ३० मे २०२६ दरम्यान प्रत्येक शनिवारी हुजूर साहिब नांदेड येथून सकाळी ०८:४५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १४ वाजता हजरत निजामुद्दीन येथे पोहोचेल. या कालावधीत एकूण ८ फेऱ्या चालविण्यात येतील. ही गाडी हुजूर साहिब नांदेड येथून दिनांक ११, १८, २५ एप्रिल आणि ०२, ०९, १६, २३ आणि ३० मे २०२६ रोजी धावेल. गाडी क्र. ०७६२१ हुजूर साहिब नांदेड हजरत निजामुद्दीन साप्ताहिक विशेष गाडीचे आरक्षण दिनांक ५ एप्रिल रोजी सकाळी ८:०० वाजता सुरू होईल. परतीच्या दिशेने गाडी क्र. ०७६२२ हजरत निजामुद्दीन-हुजूर साहिब नांदेड साप्ताहिक विशेष ही गाडी १२ एप्रिल २०२६ ते ३१ मे २०२६ दरम्यान प्रत्येक रविवारी हजरत निजामुद्दीन येथून रात्री २१:४० वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी रात्री ००:३५ वाजता हुजूर साहिब नांदेड येथे पोहोचेल. या गाडीच्या देखील ०८ फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. ही गाडी हजरत निजामुद्दीन येथून दिनांक १२, १९, २६ एप्रिल आणि ०३, १०, १७, २४ आणि ३१ मे २०२६ रोजी धावेल.

या विशेष गाड्या पूर्णा, परभणी, सेलू, परतूर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मनमाड, जळगाव, भुसावळ, खंडवा, इटारसी, भोपाळ, बीना, झांसी, ग्वाल्हेर, आग्रा कॅन्ट आणि मथुरा या स्थानकांवर दोन्ही दिशांनी थांबतील. या गाड्यांमध्ये २ सी, ३ सी, स्लीपर आणि जनरल सेकंड क्लास असे २४ कोचेस असतील, ज्यामुळे उन्हाळ्यातील प्रवाशांच्या सोयीसाठी अतिरिक्त प्रवास सुविधा उपलब्ध होणार आहे.

# कै. रावसाहेब अतांपूरकर पुण्यतिथीनिमित्त ८ एप्रिलला कीर्तन सोहळा व कुस्त्यांची दंगल

**शंकरनगर (प्रतिनिधी)** – देगलूर-बिलोली मतदारसंघाचे माजी आमदार कै. रावसाहेब अंतापूरकर यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त दि. ८ एप्रिल रोजी अंतापूर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचबरोबर माता महाकाली यात्रेनिमित्त कुस्त्यांची भव्य दंगल आयोजित करण्यात आली असून, कुस्तीपटूंनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या निमित्ताने दि. ८ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता कै. अंतापूरकर यांच्या समाधीस्थळी केसरी कीर्तनकार ह.भ.प. श्रावण जगताप महाराज यांचे कीर्तन होणार आहे. तसेच दि. ९ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता गुलाल कार्यक्रम आणि दुपारी १ वाजता महाप्रसादाचे व ४ वाजता कुस्तीच्या दंगलचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांचा परिसरातील भाविक व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन देगलूर-बिलोलीचे आमदार जितेश अंतापूरकर व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बहुजन समाज पार्टीतर्फे नांदेड येथे फुले - आंबेडकर जयंती फेस्टिव्हल

**नांदेड (प्रतिनिधी)** –बहुजन समाज पार्टी नांदेड जिल्ह्याच्या वतीने ११ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान फुले – आंबेडकर जयंती फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने चार दिवस भरगच्च सांस्कृतिक व वैचारिक कार्यक्रमांची मेजवानी ठेवण्यात आली आहे.

बीएसपी भवन, गणेश नगर नांदेड येथे बहुजन समाज पार्टी जिल्हा कार्यकारिणीची बैठक नुकतीच संपन्न झाली. महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव फुले जयंती ११ एप्रिल ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १४ एप्रिल २०२६ पर्यंत साजरा करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

सामाजिक प्रबोधन, व्याख्यान, क्रांतिकारी गीतगायन, पेन, वह्यांचे वाटप, मोफत आरोग्य तपासणी शिबीर, स्नेहभोजन आणि डी. जे. मिरवणूक इत्यादी भरगच्च उपक्रम महात्मा फुले पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा आणि बीएसपी भवन परिसरात आयोजित करण्यात आले आहेत.

या बैठकीत बहुजन समाज पार्टीचे राज्य कार्यकारिणी सदस्य इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर, मराठवाडा झोन प्रभारी मनिष कावळे आणि जिल्हाध्यक्ष सुभाष भोकरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी सूत्रसंचालन जिल्हा महासचिव सुधाकर सरोदे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार जिल्हा प्रभारी शिवाजी सोनटक्के यांनी मानले.

यावेळी महिला प्रदेश सचिव वंदना गव्हाणे, जिल्हा कोषाध्यक्ष सखाराम इंगोले, जिल्हा प्रभारी धम्मपाल गच्चे, लक्ष्मण वायवळे, सटवाजी सोनकांबळे, लोकेश कांबळे, महिला जिल्हाध्यक्षा मायाताई पाटील, दीपमाला कांबळे, शहराध्यक्षा मंगल निलंगे, उपाध्यक्ष मनिषा मवाडे, छायाताई गायकवाड, चंद्रकला ढगे, छायाबाई वाघमारे, शोभा कोकरे, महानगराध्यक्ष अनिकेत आळंदीकर, कोषाध्यक्ष नारायण घुले, गोविंद वाघमारे, महेश गायकवाड, शहराध्यक्ष तथागत कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# नांदेड पतंजलीचे एकदिवसीय योग शिबिर संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** – जालंदर पतंजलीचे जिल्हा प्रभारी बख्शीश सिंह मठाडू नांदेड सचखंड गुरुद्वाराला दर्शनासाठी आले असताना अशोक नगर हनुमान मंदिर ठिकाणी एक दिवशीय महाहास्ययोग तसेच संगीतमय योगासने जॉगिंग असा आनंदमय योग शिबीर घेतला. नांदेड पतंजलीच्या सर्व योगसाधकांनी या शिबिराचा मनसोक्त आनंद लुटला.

याप्रसंगी जालंदरचे अमरपालसिंग व नांदेड येथील सर्वश्री पंढरीनाथ कंठेवाड, राम शिवपनोर, सदाशिव बुटले पाटील, शिवाजीराव पेन्सलवार, शिवाजीराव शिंदे हळदेकर, सुरेश लंगडापुरे, भगवान कल्याणकर, हरिहर नरवाडे, देवेश सलगरकर, दिलीप आघाव, शैलेंद्र नावडे, व्यंकट कल्याणपाड, पंडित पाटील, केशव रामोडे, राजू शेटे, जनार्दन आठवले, अनिल कामिनवार, हनुमंत ढगे, छाया दाभाडे, मोनाबाई मोहिते, शोभा देशमुख, राजश्री सावंत, सुनिता गिरी, रोहिणी कोटूरवार, देवकन्या झुरळे, राम कौर, अनिता लाड, मंगल येताळकर, तृप्ती वनभैरू, संगीता शेटे, अर्चना रामनगिरे, विजयलक्ष्मी याजुलवाड, विपला नेत्यावार, सुरेखा बदकुलवार, करुणा राऊत, लक्ष्मीबाई कहाळेकर, सुनंदा उरे, अनुसया जाधव, तारा दळवी, समीक्षा शिंदे, अभिनव शिंदे, सोनाली डफडे, सिंधू क्षीरसागर, रामप्रसाद कदम, अवधूत लाभशेटवार, सुनंदा बंडे, नामदेवराव मोहिते, मोनाबाई मोहिते, महालाबाई येताळकर, दिगंबर येताळकर, बालाजीराव कहाळेकर, गिरीश कहाळेकर, भानुदास बोरसे, भगवान देशमुख, पांडुरंग, भारत गादेवार, उद्धव चाभरकर, मुंजाजी जाधव, भुजंगराव केंद्रे, सौ. कावळे, अनिल कदम, माधव पचलिंगे, रामकृष्ण धर्माधिकारी, सतीश पाठक, दिगंबर पाटील, दिगंबर कुठे, श्रीराम भुसेवाड, व्यंकटेश कोटगीरे, रघुनाथ जाधव, अनुसया जाधव, सुनंदा बंडे, विष्णुदास शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते, असे अनिल अमृतवार यांनी सांगितले.

# साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटलच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**किनवट (प्रतिनीधी)** – भारत जोडो युवा अकादमी संचालित साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, कोठारी, नांदेड रोड, किनवट येथे दि. १ एप्रिल २०२६ रोजी कुटुंब नियोजन (लॅप्रोस्कोपी) शस्त्रक्रिया शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण १२ महिला रुग्णांवर दुर्बिणीद्वारे (लॅप्रोस्कोपी) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या. सर्व शस्त्रक्रिया प्रख्यात जनरल सर्जन डॉ. अशोक बेलखोडे यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने केल्या. त्यांनी आजपर्यंत १ लाखांपेक्षा जास्त यशस्वी शस्त्रक्रिया केल्याचा अनुभव या शिबिरातून दिसून आला. या प्रसंगी डॉ. भाग्यश्री बेलखोडे, डॉ. दुर्गा काकडे व डॉ. विद्या गोलकोंडावर यांनी सहकार्य केले. तसेच वंदना उइके, आश्विनी उइके व अनुभवी स्टाफ नर्सेस यांनी शस्त्रक्रिया प्रक्रियेत मोलाचे सहकार्य केले. विशेष बाब म्हणजे, या सर्व शस्त्रक्रिया फक्त २५०० रुपयांच्या अल्पदरात करण्यात आल्या, ज्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांना मोठा दिलासा मिळाला.

तसेच रुग्णांच्या नातेवाईकां-साठी मोफत जेवणाचीही व्यवस्था करण्यात आली होती. या शिबिराद्वारे सुरक्षित, प्रभावी व आधुनिक पद्धतीने कुटुंबनियोजन सेवा उपलब्ध करून देण्यात आली असून, रुग्णांनी व त्यांच्या नातेवाईकांनी समाधान व्यक्त केले. हॉस्पिटल प्रशासनाने भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम राबवून सर्वसामान्य नागरिकांना उत्तम व परवडणाऱ्या दरात वैद्यकीय सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

# सामूहिक मौंज मेळावा उत्साहात संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)** –अखिल भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघ जिल्हा शाखा नांदेडने आयोजित केलेला चौथा सामूहिक मौज मेळावा अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात व विधीपूर्वक संपन्न झाला.

अखिल भारतीय बहूभाषिक ब्राह्मण महासंघ शाखा नांदेडच्यावतीने सामूहिक मौंज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी सामूहिक मौंज मेळाव्याचे चौथे वर्षे होते. हा मौंज मेळावा साई लॉन्स मालेगाव रोड नांदेड येथे संपन्न झाला.

या मेळाव्यास बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुरेश मुळे यांची विशेष उपस्थिती होती. या मौंज मिळाव्यात चैतन्य प्रशांत देशपांडे, आयुष गजानन वैष्णव, दिव्यांस बालाजीराव कुलकर्णी, वेदांत संजय मेहुणकर, प्रज्वल प्रशांत जोशी, गौरव समीर पांडे, अन्वित गजानन कुरुमभट्टे या सात बटूंवर उपनयन संस्कार संपन्न झाले. या संस्कारात मुख्य पुरोहित सतीश पोद्दार गुरुजी व रवी गुरु अंबुलगेकर, गिरीश गुरु वाढोणकर यांनी शांतिपाठ करून व मंत्रोचारात मौंज संस्कारास सुरुवात केली.सर्व उपनयन संस्कार विधिपूर्वक संपन्न झाला. नंतर भोजन, भिक्षा व मिरवणुकीने मौंज मेळाव्याची सांगता झाली. या मौंज मेळाव्यास महासंघ महाराष्ट्र महिला संघटक सौ. सरला शेष, नगरसेवक अॅड. महेश कनकदंडे, अ. भा. ब्रा. महासंघ अध्यक्ष निखिल लातूरकर, नगरसेविका कु. शांभवी साले, बिलोलीच्या नगरसेविका सौ. मैथिली कुलकर्णी, नगरसेवक आशीष नेरळकर, बालासाहेब पांडे, भरत रेनापूरकर, अॅड. गंगाबिषण कांकर, शितल खांडील आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

या सामूहिक मौंज मेळाव्यास साई लॉन्सचे मालक संजय औरादकर व सुभाषराव कल्याणकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सामूहिक मौंज मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी महासंघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष बंडोपंत कुंटूरकर, महाराष्ट्र प्रसिद्धीप्रमुख सखाराम कुलकर्णी, संघटक प्रा. रमाकांत जोशी चिखलीकर, दत्तात्रय पारखे, श्रीनिवास देशपांडे, गोविंदराव चौधरी, जगदीश कुंटूरकर, संजय गौतम, अॅड. रमेश राजुरकर, पत्रकार कृष्णा उमरीकर, रघुनाथ सरदेशपांडे, सुरेश बिंदू, सौ कुंटूरकर, सौ जोशी चिखलीकर, सौ. मृणाल कुंटूरकर आदी पदाधिकाऱ्यांनी मेळावा यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले होते. हा मौंज सोहळा उत्साहात व विधीपूर्वक संपन्न झाल्यावर बटूंच्या पालकांनी व उपस्थित मान्यवरांनी तसेच ब्रह्मवृंदांनी आयोजक टीमचे कौतुक केले.

# प्रगतीमंत्र

## ‘अमृत भारत एक्सप्रेस’चा संपूर्ण कायापालट होणार

### रेल्वेने तयार केला सॅम्पल कोच...

अमृत भारत एक्स्प्रेसने प्रवास करणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. प्रवाशांची सुरक्षा आणि सोय वाढवण्यासाठी रेल्वेने नवीन डब्यांची रचना आणि सुधारित शौचालयांचे मॉडेल विकसित केले आहेत. हे डबे वेगवेगळ्या अंतर्गत रंगसंगतीने सजवलेले आहेत. अमृत भारत एक्सप्रेस ही एक आधुनिक नॉन-एसी सुपरफास्ट स्लीपर क्लास रेल्वे सेवा आहे, जी किफायतशीर, लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी तयार करण्यात आली आहे. ही सेवा ३० डिसेंबर २०२३ रोजी सुरू करण्यात आली. सध्या अमृत भारत एक्सप्रेस देशभरात अंदाजे नऊ मार्गांवर धावते.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी शनिवारी नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर अमृत भारत एक्स्प्रेसच्या सॅम्पल डब्यांची पाहणी केली. अमृत भारत एक्स्प्रेस सणासुदीच्या काळात होणारी मोठी प्रवासी वाहतूक हाताळण्यासाठी तयार करण्यात आली आहे. १,००० किमीपर्यंतचे भाडे ५०० आहे. प्रत्येक ट्रेनमध्ये ११ जनरल डबे, ८ स्लीपर डबे, १ पॅन्ट्री कार आणि दोन सेकंड-क्लास-कम-लगेज कंपार्टमेंट आहेत.



#### डब्यांचे नवीन स्वरूप

रेल्वे आता अमृत भारत एक्स्प्रेसच्या डब्यांमध्ये मोठा बदल घडवून आणत आहे. पीव्हीसी फ्लोअरिंग, आसने आणि बर्थसाठी रेक्झिन, स्नॅक टेबल, पडदे आणि शौचालये यांसारखे महत्त्वाचे घटक एकाच रंगात आहेत. या डब्यांमध्ये वापरलेले सर्व साहित्य एचएल३ (HL3) अग्निसुरक्षा मानकांची पूर्तता करते. यामुळे प्रवाशांची सुरक्षा वाढेल आणि डबे अधिक आकर्षक दिसतील. रेल्वेच्या म्हणण्यानुसार, ही रंगसंगती आधुनिक, आकर्षक आणि एकसमान स्वरूप देते. तसेच ती मजबूत असून तिच्या देखभालीसही सोपी आहे. हा उपक्रम भारतीय रेल्वेच्या रेल्वे गाड्यांचे आधुनिकीकरण करणे, रेल्वेतील वातावरण सुधारणे आणि सर्व वर्गांतील प्रवाशांना सुरक्षित, आरामदायक व जागतिक दर्जाचा प्रवास अनुभव प्रदान करण्याच्या चालू प्रयत्नांचा एक भाग आहे.

## देशातील क्रमांक 1 च्या अभियांत्रिकी महाविद्यालयात 3 नवीन एमटेक अभ्यासक्रम

**देशातील क्रमांक १ च्या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेशाचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) मद्रासने अनेक नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केले आहेत. यामध्ये तीन नवीन मास्टर्स ऑफ टेक्नॉलॉजी (एमटेक) अभ्यासक्रम आणि एक मास्टर्स ऑफ आर्ट्स (एमए) यांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश गेट (GATE) गुणांच्या आधारे होणार आहे. प्रवेशासाठी इच्छुक उमेदवार या अभ्यासक्रमांबद्दलचा तपशील जाणून घेऊ शकतात...**

नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) २०२५ मध्ये आयआयटी मद्रास अभियांत्रिकी श्रेणीत प्रथम क्रमांकावर आहे. त्यामुळे या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळवण्याचे स्वप्न लाखो तरुण पाहतात. बी.टेकचा प्रवेश जेईई मेन्स आणि जेईई ॲडव्हान्स्डवर आधारित आहे आणि एम.टेकचा प्रवेश गेट (GATE) गुणांवर आधारित आहे.

### प्रवेशाच्या अटी

संस्थेच्या अधिकृत वेबसाइट mtechadm.iitm.ac.in नुसार, केवळ पदवीधर आणि गेट (GATE) उत्तीर्ण उमेदवारच दोन वर्षांच्या एम.टेक. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र आहेत. एम.ए. पदवी मिळवण्यासाठी, विद्यार्थ्यांना किमान २०० क्रेडिट्स पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रत्येक अभ्यासक्रमात भारतीय विद्यार्थ्यांसाठी २५ जागा असतील, तर परदेशी विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त जागा असतील.

### प्रवेश गेट (GATE) गुणांवर आधारित




### 3 एम. टेक अभ्यासक्रमांचे डिटेल्स...

- » आयआयटी मद्रासने चार नवीन पदव्युत्तर कार्यक्रमांची घोषणा केली आहे, त्यापैकी तीन एम.टेक प्रवेशाकडे घेऊन जातात.
- » सेमीकंडक्टर मटेरियल्समध्ये एम.टेक : सेमीकंडक्टर मटेरियल्स टेक्नॉलॉजीमधील एम.टेक हा अभ्यासक्रम मेटलर्जिकल अँड मटेरियल्स इंजिनिअरिंग विभागाद्वारे चालवला जातो. यामध्ये सेमीकंडक्टरचे ज्ञान आणि उत्पादन तंत्रांवर लक्ष केंद्रित केले जाते.
- » सीईएमएस (CEMS) सह मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधील एम.टेक : हा अभ्यासक्रम मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाद्वारे चालवला जातो. यामध्ये सिम्युलेशन-आधारित इंजिनिअरिंग, मेकॅनिक्स आणि मशीन लर्निंगवर लक्ष केंद्रित केले जाते.
- » रोबोटिक्समधील एम.टेक : हा अभ्यासक्रम इंजिनिअरिंग डिझाइन विभागाद्वारे चालवला जातो. या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना रोबोटिक्स आणि स्मार्ट ऑटोमेशनबद्दल शिकवले जाते. वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

### पब्लिक पॉलिसीमध्ये एमए सुद्धा सुरू...

पब्लिक पॉलिसीमध्ये एमए हा अभ्यासक्रम Humanities and Social Sciences विभागाद्वारे चालवला जातो. हा अभ्यासक्रम अशा विद्यार्थ्यांसाठी आहे ज्यांना सरकार आणि संस्था धोरणे कशी तयार करतात आणि त्यांची अंमलबजावणी कशी करतात हे समजून घ्यायचे आहे. यामध्ये शिक्षण, आरोग्य, ऊर्जा, वाहतूक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडी यांसारख्या विषयांचा समावेश आहे. धोरण समज, विचार आणि नेतृत्व कौशल्ये विद्यार्थी शिकतील. पदवी पूर्ण केल्यावर, ते शासकीय, खासगी आणि गैर-लाभकारी क्षेत्रांमध्ये काम करण्यास तयार होतील.

## परदेशात करायचेय एमबीबीएस?



### सर्वप्रथम NMC ताजा अलर्ट वाचा, उझबेकिस्तानचे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना केलेय सावध

**तुम्ही परदेशात एमबीबीएस करण्याचा विचार करत असाल तर तुम्हाला राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या (NMC) ताज्या अलर्टची माहिती असायला हवी. परदेशात वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याचा विचार करणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना अभ्यासाशी संबंधित ज्या तोट्यांची त्यांना जाणीव असायला हवी, त्याबद्दल ‘एनएमसी’ने माहिती दिली आहे. या सल्ल्यामध्ये एनएमसीने विशेषतः उझबेकिस्तानमधील त्या विद्यापीठांचा उल्लेख केला आहे, जिथे भारतीय सध्या शिक्षण घेत आहेत.**

२०२३ ते २०२५ दरम्यान परदेशातील वैद्यकीय शिक्षणासंदर्भात भारतीय विद्यार्थ्यांसाठी अनेक सूचना जारी करण्यात आल्या होत्या. हा सल्ला त्याच मालिकेचा एक भाग आहे. परदेशात वैद्यकीय अभ्यासक्रम करताना भारतीय विद्यार्थ्यांनी सर्व नियमांचे पालन करावे, असे त्यात स्पष्टपणे नमूद केले आहे. सध्याच्या मार्गदर्शक सूचनेत पूर्वी चर्चा केलेल्या चिंतांचाही उल्लेख आहे. एनएमसीच्या नवीन मार्गदर्शक सूचनेवरून असे दिसून येते की, पूर्वी इशारा देऊनही विद्यार्थी खबरदारी घेत नाहीत. विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या बाबी विचारात घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. यात परदेशी विद्यापीठाची मान्यता, अभ्यासक्रमाची रचना आणि ते भारतीय वैद्यकीय शिक्षण नियमांचे पालन करते की नाही, याचा समावेश आहे. एनएमसीने यावर जोर दिला आहे की, सखोल पडताळणीशिवाय प्रवेश घेतल्यास भारतात वैद्यकीय व्यवसाय करताना आव्हाने निर्माण होऊ शकतात. वास्तविक, परदेशात शिक्षण घेत असलेल्या भारतीय वैद्यकीय विद्यार्थ्यांना भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्याची परवानगी केव्हा मिळेल, हे एनएमसीने आधीच नमूद केलेले आहे. परदेशातून वैद्यकीय पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना ‘एफएमजीई’ परीक्षा उत्तीर्ण झाल्यावरच भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्याची परवानगी आहे. उझबेकिस्तानचे उदाहरण देऊन एनएमसीने सतर्कतेचा इशारा दिला आहे. या देशाचा उल्लेख अशा वेळी करण्यात आला आहे, जेव्हा मोठ्या संख्येने भारतीय विद्यार्थी तिथे शिक्षण घेण्यासाठी जात आहेत. उझबेकिस्तानमध्ये शिक्षण घेण्यासाठी जाताना विद्यार्थ्यांनी हे जाणून घेतले पाहिजेत, की ते ज्या विद्यापीठात प्रवेश घेत आहेत ते एनएमसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करते की नाही. बनावट प्रवेश प्रस्तावांना बळी न पडण्याचा इशाराही दिला आहे. कोणतीही संस्था विहित नियमांचे पालन केल्याशिवाय प्रवेश देत नाही, ज्यामध्ये नीट (NEET) परीक्षा उत्तीर्ण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणत्याही संस्थेला किंवा एजंटला पैसे देण्यापूर्वी, सखोल पडताळणी करा. विद्यापीठाची मान्यता तपासणे आवश्यक आहे.

## कॉर्पोरेट झगमगाट सोडून अडीच लाखांत सुरू केला व्यवसाय!

### आता कोट्यवधीची उलाढाल





**ही एका अशा जोडप्याची कहाणी आहे, ज्यांनी कॉर्पोरेट जीवनातील चमकधमक सोडून स्थानिक व्यवसाय करून स्वतःचे नाव कमावले. अभिषेक चौधरी हे बंगालमधील सिलीगुडीचे आहेत. संजुती महातो या झारखंडमधील बोकारोच्या रहिवासी आहेत. त्यांनी एकत्र मिळून २०२१ मध्ये ‘अर्थ स्टोरी फार्म्स’ नावाचा एक उपक्रम सुरू केला. यात प्रिझर्व्हेटिव्ह नसलेली प्रादेशिक उत्पादने विकली जातात. ज्यात नोलेन गूळ, बिलोना तूप, औषधी मध, लोणची, बाजरी, तांदूळ आणि जीआय-टॅग केलेले मसाले यांचा समावेश आहे. केवळ २.५ लाख रुपयांच्या भांडवलाने सुरू झालेल्या या उपक्रमाने आता १.२५ कोटी रुपयांची उलाढाल गाठली आहे. अभिषेक चौधरी आणि संजुती महातो यांच्या यशाचा प्रवास जाणून घेऊया...**

- » कॉर्पोरेट जगात दीर्घकाळ काम : अभिषेक चौधरी हे आयआयएम-कलकत्त्यातून एमबीए झालेले असून, माजी आयटी सल्लागार आहेत. संजुती महातो या जेएनयूमधून राज्यशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवीधारक आहेत. त्या जाहिरात क्षेत्रातून आल्या आहेत. दोघांनीही आपापल्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडून उद्योजकतेचा मार्ग निवडला. विप्रो आणि आयबीएमसारख्या कंपन्यांमध्ये १२ वर्षे काम केल्यानंतर अभिषेकने ग्रामीण उपजीविकेवर काम केले. तर, संजुतीने ओगिल्वी आणि डेंटसूसारख्या मोठ्या एजन्सींमध्ये ब्रँड बिल्डिंगचे बारकावे शिकण्यात १८ वर्षे घालवली होती. त्यांच्या विविध अनुभवांनी त्यांच्या ‘अर्थ स्टोरी फार्म्स’ या उपक्रमासाठी एक मजबूत पाया पुरवला.
- » सुरुवातीच्या आव्हानांना सामोरे जाणे... : सुरुवातीला अभिषेक आणि सेन्जुती यांनी बंगालमधील बांकुरा येथे १० एकर जमिनीवर शेती करण्यास सुरुवात केली. कोविड-१९ महामारीच्या काळात त्यांनी कोलकातामध्ये घरोघरी भाजीपाला पोहोचवला. त्यांच्या लवकरच लक्षात आले की भारतीय ग्राहकांना ताज्या भाज्या प्रत्यक्ष पाहून आणि हाताळून खरेदी करायला आवडतात. यामुळे हे मॉडेल मोठ्या प्रमाणावर राबवणे कठीण झाले. त्यानंतर, त्यांनी आपली रणनीती बदलली आणि पॅकेज केलेल्या पारंपरिक उत्पादनांवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी बांकुराच्या प्रसिद्ध ‘नोलन गूळ’पासून सुरुवात केली. त्याला थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवणारा ब्रँड म्हणून स्थापित केले.

### व्यवसायात तेजी...

अभिषेक आणि संजुती यांचा स्टार्टअप केवळ २.५ लाख रुपयांनी (आर्थिक वर्ष २०२१-२२) सुरू झाला. आर्थिक वर्ष २०२४-२५ पर्यंत तो सव्वा कोटींपर्यंत वाढला होता. आज, त्यांची उत्पादने ब्लिंकइट, स्विगी इन्स्टामार्ट आणि ॲमेझॉन यांसारख्या प्लॅटफॉर्मवर, तसेच बॉम्बे कॅन्टीन आणि ब्लू टोकाई यांसारख्या प्रीमियम कॅफेमध्ये वापरली जात आहेत. पुढील पाच वर्षांत १०० कोटींचा महसूल गाठण्याचे या दोघांचे ध्येय आहे. ते मध्य-पूर्वेकडील देशांमध्ये निर्यात सुरू करण्याची तयारी करत आहेत. या दोघांना पारंपरिक भारतीय खाद्यसंस्कृतीला जागतिक स्तरावर आणायचे आहे.

- » व्यवसायाचे मॉडेल थोडे वेगळे : अभिषेक आणि संजुती यांचे मॉडेल स्वतःचे कारखाने उभारण्याऐवजी स्थानिक कारागीर आणि बचत गटांसोबत काम करण्यावर आधारित आहे. त्यांच्या प्रमुख उत्पादन ‘नोलन गूळ’मध्ये कोणत्याही रसायनांचा वापर केला जात नाही. त्याचप्रमाणे, ते सुंदरबनमधून दुर्मिळ खारफुटीचा मध, मेदिनीपूरमधून बिलोना तूप आणि झारखंडमधून नाचणी व बाजरीसारखी भरड धान्ये मिळवतात. सध्या त्यांच्याकडे ११ हून अधिक जीआय-टॅग असलेली उत्पादने आहेत आणि पुढील वर्षापर्यंत ही संख्या ५० पर्यंत वाढवण्याची त्यांची योजना आहे.

## दगड फोडून उदरनिर्वाह करणारा मुलगा डीएसपी!

**कधीकधी आपण अशा लोकांच्या कथा ऐकतो किंवा वाचतो, जे अशक्य गोष्ट शक्य करून दाखवतात. मध्य प्रदेशचा रहिवासी असलेल्या संतोषची कथाही अशीच आहे. लहानपणापासूनच आपल्या कुटुंबाला गरिबीत पाहून, त्याने दगड फोडण्यापासून ते इतर किरकोळ कामांपर्यंत अनेक छोटी-मोठी कामे केली. त्याला समजले होते, की आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी, त्याला असे काहीतरी करावे लागेल ज्याचा बहुतेक लोक विचारही करत नाहीत. आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर संतोषने एमपीपीएससी (MPPSC) परीक्षा उत्तीर्ण केली आणि डीएसपी (DSP) बनून आपले नशीब स्वतः लिहिले. आज, त्याची यशोगाथा संघर्ष करणाऱ्या तरुणांसाठी एक उदाहरण बनली आहे...**




एका मुलाखतीत संतोष पटेल यांनी सांगितले की ते मध्य प्रदेशातील पन्ना जिल्ह्यातील अजयगढ तालुक्यातील देवगावचे रहिवासी आहेत. त्यांचे कुटुंब हालाखीच्या परिस्थितीत जगत होते. त्यामुळे संतोष यांनी लहानपणापासूनच गरिबी अनुभवली. त्यांनी लहान वयातच पैसे कमवायला सुरुवात केली. संतोष आपल्या कुटुंबासोबत आणि वडिलांसोबत विविध कामे करायचा. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी आणि खर्च भागवण्यासाठी, तो आणि त्याचे कुटुंब वेगवेगळ्या ऋतूंमध्ये काम करायचे. त्याचे आई- वडील त्याला कामावर घेऊन जायचे. कधी तो दगड फोडायचा, तर कधी तेंदूची पाने गोळा करून विकण्यासाठी जंगलात जायचा. यातून त्याला उत्पन्न मिळायचे. पावसाळ्यात तो झाडे लावायचा. संतोषच्या आयुष्यातील पहिला मोठा टर्निंग पॉइंट तेव्हा आला, जेव्हा काहीतरी बदल घडवण्याच्या इच्छेने त्याने पन्ना येथील एका चांगल्या शाळेत प्रवेश घेतला. तेथील शिक्षण आणि शिस्तीने त्याचे मन आणि विचार घडवले. दहावीत ९२ टक्के गुण मिळवणे ही केवळ त्याच्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण गावासाठी अभिमानाची गोष्ट होती. या काळात जंगलातून लाकूड गोळा करण्यासारखी रोजची आव्हाने त्याच्या आठवणींचा भाग बनली.

### अभियांत्रिकीचे शिक्षण

बारावीनंतर संतोषने आयआयटीमध्ये प्रवेश घेतला पण तो अयशस्वी झाला. त्यानंतर त्याने भोपाळ येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. या काळात त्याने नेटवर्क मार्केटिंगमध्येही काम केले आणि कुटुंबाच्या अपेक्षांमुळे एमटेकसाठी प्रवेश घेतला. याच काळात त्याला नागरी सेवांमध्ये रस निर्माण झाला आणि त्याने तयारी सुरू केली.

### ग्वाल्हेरचे डीएसपी झाले!



एमटेक पूर्ण केल्यानंतर, संतोषने लाल दिव्याच्या गाडीवाली नोकरी मिळेपर्यंत दाढी न करण्याची शपथ घेतली. आर्थिक अडचणी असूनही, पुस्तकांवरील आणि मेहनतीवरील त्याचा विश्वास कधीच कमी झाला नाही. त्याची वनरक्षक पदासाठी निवड झाली आणि त्यानंतर त्याने दोन प्रयत्नांत पीएससी परीक्षा उत्तीर्ण करून डीएसपी पद मिळवले. आज ते ग्वाल्हेरमध्ये बेहट उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

# भोंदू अशोक खरातचं बीड कनेक्शन, गर्भलिंगनिदान अन् चाकणकरांचं नाव; पत्रानंतर महिला नेत्याचा गंभीर आरोप

**बीड (प्रतिनिधी)** भोंदू अशोक खरात प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली ठोंबरे यांना बीडमधून निनावी पत्र पाठवण्यात आलं आहे. या पत्रात राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या एका महिला पदाधिकाऱ्याचे नाव आल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. रुपाली चाकणकर यांच्या आशीर्वादाने बीडमधील महिला पदाधिकारी अशोक खरातकडे येथील महिला नेत होत्या, असा खळबळजनक दावा या पत्रात करण्यात आलाय. त्यामुळे, पुन्हा एकदा अशोक खरात प्रकरणावरुन रुपाली चाकणकर यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विशेष म्हणजे गर्भलिंग निदान याबाबत चाकणकरांकडून अशोक खरात पाठराखण केली जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या हेमा पिंपळे यांनी केला आहे. पिंपळे यांनी संबंधित पत्राचा दाखलाही दिला.

बीडमधील डॉक्टरांकडून लिंगनिदान केलं जात होतं. या पत्रानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या हेमा पिंपळे यांनी पत्राची सत्यता तपासून पोलीस अधीक्षकांनी सुमोटो दाखल करून एसआयटीकडे हे पत्र द्यावे, याची चौकशी करावी अशी मागणी केली. तर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा लिंगनिदान होण्यासाठी पाठबळ देत होत्या, ही गंभीर बाब असल्याचा आरोप देखील पिंपळे यांनी केला. संबंधित पत्रावरील सहीची तपासणी केली तर त्या व्यक्तीपर्यंत पोहोचता येईल म्हणून त्याची सत्यता तपासण्याची मागणी केली जात आहे. अशोक खरातकडे बीडमधील महिला जात होत्या अशी चर्चा आतापर्यंत बीडमध्ये होती. परंतु, या पत्रातून त्याला उजाळा मिळाला असल्याचं पिंपळे यांचं म्हणणं आहे.

दरम्यान, अशोक खरातप्रकरणी अद्यापही एसआयटीकडून आरोपीचा कसून तपास केला जात आहे. या तपासातून दररोज नवनवे कारनामे समोर येत आहेत. दुसरीकडे रुपाली चाकणकर यांनाही एसआयटीने समन्स पाठवून चौकशीसाठी बोलावले होते. तत्पूर्वी त्यांचा महिला आयोग अध्यक्षपदाचा राजीनामा घेण्यात आला असून राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदावरुनही त्या पायउतार झाल्या आहे. त्यामुळे, त्यांच्या भूमिकेकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यातच, आता गर्भलिंगनिदान यास त्यांनी समर्थन दिल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर बीडमधील हेमा पिंपळे यांच्याकडून केला जात आहे.

बीडच्या घाटनांदूर येथील बापूराव चव्हाण या ऊसतोड मजुराने कारखान्याची उचल घेतली होती. या उचलीच्या पैशाच्या कारणावरुन त्यांचे अपहरण करण्यात आल्याची तक्रार त्यांच्या पत्नीने दिली आहे. बापूराव चव्हाण हे घाटनांदुर या गावात गेले असताना त्या ठिकाणाहून चार जणांनी त्यांना एका कारमध्ये बसवून नेल्याची माहिती समोर आली होती. महिलेने दिलेल्या तक्रारीत किती रकमेसाठी हे अपहरण झाले आणि कोणत्या कारखान्याची उचल होती याची माहिती दिलेली नाही. या प्रकरणात आता अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

# मराठी न येणाऱ्या रिक्षाचालकांचे लायसन्स रद्द होण्याची शक्यता, फेरतपासणीचे सरकारचे आदेश

**मुंबई (प्रतिनिधी)**–रिक्षाचालकांबाबत वाढत्या तक्रारी आणि परवाना प्रक्रियेत होत असलेल्या कथित गैरप्रकारांनंतर राज्य सरकार ॲक्शन मोडमध्ये आलं आहे. मीरा–भाईंदर परिसरात बोगस कागदपत्रांच्या आधारे रिक्षा आणि टॅक्सी परवाने मिळाल्याच्या तक्रारींनंतर आता परवान्यांची सखोल फेरतपासणी केली जाणार आहे. या परवाना फेरतपासणी दरम्यान रिक्षा चालकांना मराठी येते का, याचीही कसून पडताळणी केली जाणार आहे. तर मराठी बोलता न येणाऱ्या चालकांवर परवाना रद्द करण्याची कारवाई होण्याची शक्यता आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याबाबत कडक निर्देश दिले असून १ मेपर्यंत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

भाजपचे आमदार नरेंद्र मेहता यांनी केलेल्या तक्रारीनंतर हा मुद्दा पुढे आला. काही परप्रांतीय आणि परदेशी नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या संगनमताने बनावट कागदपत्रांच्या आधारे रहिवासी दाखले मिळवून रिक्षा आणि टॅक्सी परवाने मिळवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने ही बाब अत्यंत गंभीर मानत प्रत्येक प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

मोटार परिवहन विभागाच्या नियमांनुसार रिक्षाचालकांना मराठी भाषा येणं अनिवार्य आहे. त्यामुळे फेरतपासणीदरम्यान चालकांना मराठी येते का, याचीही कसून पडताळणी केली जाणार आहे. मराठी बोलता न येणाऱ्या चालकांवर परवाना रद्द करण्याची कारवाई होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

फक्त चालकांवरच नव्हे तर चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई होणार असल्याचे स्पष्ट संकेत मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. ऑनलाइन प्रक्रिया असतानाही बोगस कागदपत्रांच्या आधारे परवाने दिल्याच्या तक्रारी गंभीर मानल्या जात आहेत.

मीरा–भाईंदर परिसरात मागील १० वर्षांत दिलेल्या सर्व रिक्षा परवान्यांची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाणार आहे. महिनाभराचा विशेष कॅम्प आयोजित केला जाणार असून प्रत्येक कागदपत्राची बारकाईने छाननी केली जाणार आहे. आवश्यकतेनुसार अतिरिक्त मनुष्यबळही तैनात करण्यात येणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विधान भवनात आदरांजली



**मुंबई (प्रतिनिधी)**–हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विधान भवनातील त्यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्यास महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली.

याप्रसंगी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव–१ जितेंद्र भोळे, उप सचिव विजय कोमटवार, उप सभापती, यांचे खाजगी सचिव आविनाश रणखांब, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र संचालक निलेश मदाने यांचेसह अन्य अधिकारी व कर्मचारी यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

# लोखंडी रिंग कोसळून बी. टेकच्या विद्यार्थ्याचा मृत्यू

**पुणे(प्रतिनिधी)**– पुण्यातून एक अतिशय धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे. बास्केटबॉलच्या रिंगला पुश–अप मारताना लोखंडी रिंग कोसळून बी. टेकच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना तळेगावातील इंदुरी परिसरात घडली आहे. विपुल वर्मा असं मृत विद्यार्थ्याचं नाव असून तो उत्तर प्रदेशातील अयोध्येचा रहिवासी होता.

दरम्यान, या घटनेनंतर महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून प्रशासनाच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, नेमकी चूक कुणाची याचा तपास सध्या सुरू आहे.

# गॅस सिलेंडर चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला अटक, ४५ गॅस सिलेंडरसह ३ दुचाकी जप्त

**मुंबई(प्रतिनिधी)** – मुंबई, नवी मुंबई, ठाणे परिसरातून गॅस सिलेंडर चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला पवई पोलिसांनी अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपीकडून ४५ गॅस सिलेंडर व चोरीच्या ३ मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत. आखाती देशांमध्ये सुरु असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांमध्ये मोठे चिंतेचे आणि गोंधळाचे वातावरण आहे. अशातच गॅस चोरीची घटना समोर आल्यानं खळबळ उडाली आहे.

या आरोपींनी पवई पोलीस स्टेशनच्या हद्दीमधून एक दुचाकी गाडी चोरी करुन दोन गॅस सिलेंडर चोरी केली होती. या गॅस सिलेंडर चोरी आणि बाईक चोरी प्रकरणी पवई पोलिसांनी गुन्हा दाखल करून परिसरात असलेले सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपास करत ठाणे वर्तक नगर परिसरातून एका व्यक्तीला ताब्यात घेतले होते.




अटक केलेल्या आरोपीचे नाव राज चंद्रकांत कांबळे वय ४५ वर्ष आहे. त्या आरोपीकडून पवई पोलिसांनी ३ मोटरसायकल त्यासोबत मुंबई, नवी मुंबई, ठाणे परिसरातून चोरी झालेला एकूण ४५ गॅस सिलेंडर सुद्धा जप्त केली आहे.

या आरोपीविरुद्ध मुंबई शहरात दहापेक्षा जास्त गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यासोबतच या आरोपीसोबत चोरी करण्यामध्ये अजून कोणाचा हात आहे का? या संदर्भात पवई पोलीस पुढील तपास करत आहेत.

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ३५ हजार कोटींची विकास कामे होणार –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नाशिक(प्रतिनिधी)**–प्रभू श्रीराम यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या नाशिक त्र्यंबकेश्वरमध्ये पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा भव्य व अविस्मरणीय करण्यासाठी ३५ हजार कोटी रुपयांची विविध विकास कामे करण्यात येत आहेत. भाविकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात आले असून या प्रक्रियेत साधू- महतांचे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

अखिल भारतीय संत समिती–राष्ट्रीय कार्य समितीच्या दोन दिवसीय बैठकीचा समारोप तपोवनातील स्वामी नारायण मंदिर येथे झाला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अखिल भारतीय संत समिती अध्यक्ष अविचल देवाचार्यजी, महंत श्री ग्यान देवसिंग महाराज, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष रविंद्रपुरी महाराज, संत निवृत्ती महाराज, रावसाहेब महाराज गोसावी, पुरुषोत्तम महाराज देहूकर, अशोक तिवारी, श्री यतिंद्रानंद गिरीजी महाराज, जनार्दनहरी महाराज, स्वामी संविदानंद सरस्वती, जितेंद्रानंद स्वामी, ब्रह्मेशनंद महाराज, राजेंद्र दास, महंत दुर्गादास महाराज, भक्तिचरणदास महाराज आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भाविकांना गोदावरीच्या निर्मळ आणि प्रवाही पाण्यात स्नान करता यावे, यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. त्र्यंबकेश्वर येथे गोदावरीचा प्रवाह बारमाही व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. कुशावर्तासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्र्यंबकेश्वर रस्ता, नाशिक परिक्रमा मार्ग, रेल्वे स्थानकावरील सुविधा, घाटांची संख्या आणि लांबी वाढविणे, जुन्या मंदिरांचे संवर्धन, मंदिराकडे जाणाऱ्या मार्गांचे रुंदीकरण, ओझर विमानतळाचे विस्तारीकरण आदी विकास कामे सुरू आहेत. साधूग्रामसाठी कायमस्वरूपी जमीन अधिग्रहणाचा निर्णय घेण्यात आला आहे. साधूग्राममध्ये आवश्यक सर्व पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.



तसेच कुंभमेळ्याकरीता प्रयागराजच्या धर्तीवर नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या सूक्ष्म आणि नेटक्या नियोजनासाठी नाशिक येथील अधिकाऱ्यांच्या पथकाने प्रयागराजचा दौरा केला होता. मागील कुंभमेळ्याच्या तुलनेत यंदा दहा पट अधिक भाविक येण्याची शक्यता असून त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. विकासकामे करतांना साधू, महंत आणि आखाड्यांकडून आलेल्या सूचनांचाही स्वीकार करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

संत शक्ती ही सज्जनशक्ती असून साधू संतांनी भारतीय संस्कृती टिकवून ठेवल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले की, जगातील अन्य संस्कृती नामशेष होत असताना भारतीय संस्कृती टिकून राहिली. ही प्राचीन असण्यासोबतच नित्यनूतनही आहे. हेच भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. साधू संतांनी या प्रवाहातील वाईट बाबी बाजूल्या सारल्याने संस्कृतीची निरंतरता टिकून आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायानेदेखील अनेक आक्रमणांना सामोरे जात वारीची परंपरा टिकवून ठेवली. हीच परंपरा कुंभमेळ्यात प्रतिबिंबीत होते.

कुंभमेळा भारतीय अध्यात्मिक संस्कृतीचा सर्वात मोठा सोहळा आहे. मन आणि आत्म्याच्या शुद्धीकरणाचा हा सोहळा आहे. विचारांच्या प्रदूषणाला दूर सारून भारतीय संस्कृतीला प्रवाहीत करण्याचे हे पर्व आहे. या सोहळ्यात सर्व जाती–धर्माचे भाविक सहभागी होत असल्याने कुंभमेळा हा राष्ट्रीय एकात्मतेचे आणि भारतीय संस्कृतीचे प्रतिक आहे, असेही त्यांनी सांगितले. कुंभमेळ्यात केवळ पवित्र स्नान होत नाही, तर साधू - संतांचे मार्गदर्शन, विचारांचे आदान- प्रदान होत असल्याने पुढील वर्षी होणारा कुंभमेळा अविस्मरणीय होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

# इंडिया स्किल्स स्पर्धेत महाराष्ट्राची दमदार कामगिरी; ४ सुवर्ण पदकांसह एकूण १७ पदक केली प्राप्त

**मुंबई(प्रतिनिधी)**– 'वर्ल्ड स्किल्स' स्पर्धेसाठी रंगीत तालीम मानल्या जाणाऱ्या 'इंडिया स्किल्स २०२५–२६' स्पर्धेत महाराष्ट्रातील स्पर्धकांनी ४ सुवर्ण, ८ रौप्य आणि ५ कांस्य पदकांची अशी एकूण १७ पदके प्राप्त केली आहेत. उत्तर प्रदेश येथे ग्रेटर नोएडा मधील इंडिया एक्स्पो सेंटर अँड मार्ट येथे ही स्पर्धा पार पडली. आगामी २०२७–२०२८ ची ही स्पर्धा मुंबईत होण्यासाठी शिफारस करण्यात आली आहे या यशाबद्दल राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी संपूर्ण चमूचे आणि विजेत्या खेळाडूंचे मनापासून अभिनंदन केले आहे.

मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, केंद्रीय कौशल्य विकास मंत्री जयंत चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांचा गुण गौरव समारंभ पार पडला आहे.महाराष्ट्रातील तरुणांमध्ये अफाट कौशल्य आहे, हे या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. जागतिक स्तरावर भारताचे नेतृत्व करण्याची क्षमता आपल्या तरुणांमध्ये आहे. पदके जिंकणाऱ्या सर्व उमेदवारांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या संस्थांचे मी अभिनंदन करतो. आगामी वर्ल्ड स्किल्स स्पर्धेतही महाराष्ट्र अशीच उत्तुंग कामगिरी करेल, याची मला खात्री आहे.महाराष्ट्र २०२७ मध्ये राज्यस्तरीय महिला कौशल्य चॅम्पियन्स ही स्पर्धा सुरू करणार आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ, उद्योग भागीदार व तांत्रिक संस्था यांनी हे यश मिळवण्यासाठी गेल्या वर्षभरापासून विशेष मेहनत घेतली होती. सुमारे १५,२७५ नोंदणीकृत उमेदवारांमधून जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावरील चाळणी परीक्षेतून ५४ सर्वोत्तम उमेदवारांची राष्ट्रीय स्तरासाठी निवड करण्यात आली होती. स्पर्धेपूर्वी या उमेदवारांना तज्ज्ञांमार्फत विशेष 'बूटकॅम्प' प्रशिक्षण आणि मानसिक तयारीसाठी समुपदेशनही देण्यात आले होते. इंडिया स्किल्स स्पर्धेतील या विजयामुळे महाराष्ट्रातील यशस्वी उमेदवारांना आता आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. २०२६ मध्ये चीनमधील शांघाय येथे सप्टेंबर मध्ये होणाऱ्या 'वर्ल्ड स्किल्स' स्पर्धेसाठी आता या विजेत्यांच्या प्रशिक्षणाची पुढील फेरी लवकरच सुरू होणार आहे.

# पोलीस उपनिरीक्षक शारीरिक चाचणीचा सुधारित कार्यक्रम जाहीर




**मुंबई(प्रतिनिधी)**–महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा–२०२३ या परीक्षेत शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची चाचणी पूर्वी प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात आली होती. आता सुधारित कार्यक्रमा–नुसार ही शारीरिक चाचणी १५ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत घेण्यात येणार आहे.

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा–२०२३ या परीक्षेचा निकाल ९ मे २०२५ रोजी जाहीर करण्यात आला होता.परीक्षेत शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची चाचणी पूर्वी प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात आली होती.

आता सुधारित कार्यक्रमानुसार ही शारीरिक चाचणी १५ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत घेण्यात येणार आहे. चाचणी नवी मुंबई येथील पोलीस मुख्यालय, रोडपाली, सेक्टर १७, कळंबोली येथे पार पडणार असून ती डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित प्रणालीद्वारे घेतली जाणार आहे.

उमेदवारांनी शारीरिक चाचणीच्या तयारीच्या दृष्टीने याची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने करण्यात आले आहे. चाचणीचा सविस्तर कार्यक्रम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात आला असल्याचे आयोगाने कळविले आहे.

## जाहीर नोटीस

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८९/२०२६ पुढील तारीख ०४.०५.२०२६

अर्जदार–०१. अहमदबी अब्दूल कय्यूम, वय– ७२ वर्षे, व्यवसाय – गृहिणी, रा. छोटी गल्ली, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड. ०२. अब्दूल वाहिद अब्दूल खय्युम वय – ५२ वर्षे, व्यवसाय – नोकरी, रा. छोटी गल्ली, बिलोली ता. बिलोली जि.नांदेड ०३. अब्दूल समद अब्दूल खयुम पटेल, वय ५० वर्षे, व्यवसाय – शेती, रा. छोटी गल्ली, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड. ०४. शाहेदा परवीन जावेद खान पठान, वय ४९ वर्षे, व्यवसाय– घरकाम, रा. नौशाद फंक्शन हॉल दरगाह मोहल्ला धर्माबाद जि. नांदेड. ०५. अब्दूल खादीर अब्दूल खयुम पटेल वय – ४७ वर्षे, व्यवसाय शेती, रा. छोटी गल्ली, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड.

विरुध्द

गैरअर्जदारः निरंक

विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार क्रमांक ०१ ते ०५ हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०५ हे मयत अब्दूल कय्यूम मियाँसाब यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्रमांक ०१ हि मयत अब्दूल कय्यूम मियाँसाब यांची पत्नी आहे व अर्जदार क्रमांक ०२ ते ०५ हि आपत्ये आहेत. मयत अब्दुल कय्यूम मियाँसाब यांचा मृत्यु दिनांक २३.१२.२०२५ रोजी झाला. अर्जदारांनी अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०५ हयांना मयत अब्दूल कय्यूम मियाँसाब यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,

क. लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस व संबंधीतांना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मी खालील सही करणारांनी नांदेड येथील ईश्वर सुधाकर भोळे वय ४३ वर्षे रा. शास्त्रीनगर भावसार चौक तरोडा खु. नांदेड यांचे मालकीचा पुरानी शिवारातील गट क्र. १५५ मधील प्लॉट क्र.२३ ज्याची साईज १००२ चौ. फुट असून येणेप्रमाणे चर्तुसिमा–

पूर्वेस – ६.१० मी. रुंदीचा रोड
पश्चिमेस प्लॉट क्र. ३५ व ४.५० मी रुंद
रोडचा काही भाग
दक्षिणेस – प्लॉट क्र. २४
उत्तरेस–प्लॉट क्र. २२.

येणेप्रमाणे चर्तुसिमेच्या आतील वर्णनाचा प्लॉट मूळ मालक इश्वर भोळे यांचेकडून अशोक रामराव गायकवाड रा. वाडी व मोहन गोविंदराव पावडे रा. पुयणी यांनी सौदाचिठ्ठीव्दारे बॉंड क्र.५९ एबी ४४६५७६ दि.२०/०१/२०२६ रोजी त्यांचे नावे किंवा ते सांगतील त्या व्यक्तीचे नावे रजीस्ट्री करुन देण्याचे अटीवर घेतला आहे. अशोक रामराव गायकवाड व मोहन पावडे यांनी सदर प्लॉट मी खालील सही करणार टोपाजी कोरके यांना सौदाचिठ्ठीव्दारे बॉंड क्रमांक ५९ एबी ७५७२६४ याव्दारे दि.२५/०२/२०२६ रोजी विक्री करण्याचा करार केला असून, बयाणापोटी काही रक्कम देली आहे. यास मूळमालक इश्वर भोळे यांची संमती आहे. तरी वरील प्लॉट बाबत कोणास काही आक्षेप, उजर, मालकी हक्क, देवाण घेवाण,कुळ कर्ज आसल्यास त्याबाबत हे प्रगटन जाहीर झाले पासुन ०७ दिवसाचे आत आमच्याकडे लेखी कागदपत्रासह आपला आक्षेप खालील दिलेले पत्यावर प्रत्यक्ष येवुन दाखल करावा. मुदत संपल्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही असे ग्राह्य धरुन या प्लॉटची रजीस्ट्री करुन घेण्यात येईल. मुदतीनंतर आलेला आक्षेप स्वीकारल्या जाणार नाही. म्हणुन हे जाहीर प्रगटन प्रसिध्द करीत आहोत.

प्रगटन देणार –
टोपाजी एकनाथराव कोरके
रा. प्लॉट नं– ११ हनुमान मंदिरामागे सिध्दी विनायक नगर
गुरुजी चौक पूर्णा रोड, नांदेड
मो. ७२१९००२०१८.

## जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की, कै. शंकर बालाजी मुंडे (रा. वाघोली, पुणे) यांचे दिनांक २१/०७/२०२५ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या नावे प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO), पुणे येथे नोंद असलेल्या खालील वाहनांचे कायदेशीर वारसदार म्हणून त्यांची पत्नी श्रीमती पुनम शंकर मुंडे यांनी नावे बदलण्यासाठी अर्ज केला आहे.

वाहनांचा तपशीलः

१) चारचाकी वाहन: TATA MITORS LIMITED
क्रमांक: MH-12-FZ-7772

२) दुचाकी वाहन: ACTIVA 125
क्रमांक: MH-12-RL-0536

सदर वारसा हक्क किंवा वाहन हस्तांतरणाबाबत कोणावीही काही हरकत, दावा किंवा तक्रार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ पंधरा दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी पुराव्यासह संपर्क साधावा. मुद्दतीनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

ठिकाणः पुणे
अर्जदारः
श्रीमती पुनम शंकर मुडे
पत्ता: केसनंद रोड, वाघोली, पुणे, महाराष्ट्र ४११०१४.
मोबाईल:

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे
डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.
संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# आयजी उमाप यांच्या पथकाची चंदन तस्करांवर कारवाई; ५२ लाखांचे चंदन जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी नांदेड परिक्षेत्रात कामकाज करणाऱ्या विशेष पथकास लातूरवरून मध्यप्रदेशातील बुऱ्हाणपूरकडे एका आयशर वाहनातून चंदनाची वाहतूक होणार असल्याची माहिती प्राप्त झाली होती. या माहितीवरून, दि. ५ एप्रिल रोजी पहाटे नांदेड जिल्ह्यातील लोहा पोलीस ठाण्याचे हद्दीत, लोहा ते नांदेड रोडवरील सई हॉटेलजवळ पथकाने सदर आयशर वाहनास थांबवून वाहन प्रथमतः रिकामे असल्याचे आढळून आले. मात्र, आयशरचे बॉडीमध्ये ड्रायव्हरचे पाठीमागील साधारणतः तीन फूट जागेत, सहा फूट उंचीचा एक विशिष्ट कप्पा बनवण्यात आला असल्याचे पथकास आढळून आले. सदर वाहनावर चढून, त्यावरील ताडपत्री खोलून सदर कप्प्यात प्रवेश केला असता, यात अनेक गोण्यांमध्ये चंदनाचे लाकूड भरले असल्याचे निदर्शनास आले.

या कप्प्यातून चंदनाने भरलेल्या गोण्या बाहेर काढून त्यांचे वजन केले असता त्यात एकूण ३६ लाख रुपये किंमतीचे १ हजार ४७० किलो वजनाचे चंदनाचे लाकूड मिळून आले. या वाहनात ड्रायव्हर तौफिक चांदपाशा देशमुख रा. चापोली, जि. लातूर व सोबत तुकाराम शेषराव बुंदराळे रा. आनंदवाडी, चाकूर हे दोघेही उपस्थित होते. त्यांच्याकडून अधिक माहिती मिळवली असता, सदर चंदनाचे लाकूड हे त्यांना उदगीर, आनंदवाडी, चापोली व केज, जिल्हा बीड येथून रामदास शेषराव बंदराळे रा. आनंदवाडी व बाळासाहेब जाधव रा. केज, जिल्हा बीड यांनी वाहनात भरून दिल्याचे सांगितले.



या प्रकरणी आयशर वाहनातून वाहून नेण्यात येत असलेले ३६ लाख ७५ हजार रुपयांचे १ हजार ४७० किलो चंदन, एक आयशर वाहन व रोख रक्कम रुपये ११ हजार असा एकूण ५१ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपी तुकाराम शेषराव बंदराळे, (वय ३३ वर्ष, रा. आनंदवाडी ता. चाकूर, जि. लातूर), तौफिक चांदपाशा देशमुख (वय ४४ वर्ष, रा. चापोली, ता. चाकूर, जि. लातूर), रामदास शेषराव बूंदराळे, रा. आनंदवाडी ता. चाकूर जि. लातूर, बाळासाहेब जाधव, रा. अहिल्यानगर, ता. केज, जि. बीड व शंकर तानाजी मानपाडे उर्फ जाधव रा. चाकूर यांच्याविरुद्ध लोहा पोलीस ठाणे येथे गुरनं १२४/२०२६ कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता, कलम ४१. ४२ भारतीय वन अधिनियम, कलम ४ वृक्ष तोड अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास पोलीस ठाणे लोहा येथील पोउपनि पांचाळ करीत आहेत. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह हवालदार प्रदीप खानसोळे, हवालदार संजीव जिंकलवाड, गणेश धुमाळ व कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे. खबर हेल्पलाइनचा वापर करा, अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांकडे पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती या क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेजद्वारे पाठवावी असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# शहरातील अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण नियमित करु -खा. अशोकराव चव्हाण

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– राजकारणात नाती येतात आणि जातात, पण अर्धापूरची जनता आणि चव्हाण कुटुंब एक आहे. याच नात्याला फेविकॉलचा मजबूत जोड आहे, अशी उपमा देत माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी अर्धापूरच्या विकासासाठी निधीचा ओघ कमी पडू देणार नाही, असा शब्द दिला आहे. तर शहरातील १२३४ अतिक्रमणधारकांना मिळालेला दिलासा समता नगर, मदीना नगर, नवी आबादी, अशोक नगरमधील शेकडो कुटुंबे अनेक वर्षांपासून अतिक्रमणाची टांगती तलवार होती. मात्र अशोकराव चव्हाणांच्या पाठपुराव्यामुळे हा प्रश्न आता निकाली निघणार असून, या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.



निवडणुकीत दिलेला शब्द मी पाळला आहे, असे सांगत खा. चव्हाणांनी शहरवासीयांना आश्वस्त केले. अर्धापूर शहर केवळ रस्ते आणि नाल्यांपुरते मर्यादित न राहता अर्धापूरला आधुनिक शहराकडे नेण्याचा मानस चव्हाणांनी बोलून दाखवला. शहराच्या पाणी पातळीत वाढ करण्यासाठी आणि शहराच्या सौंदर्यास चालना देण्यासाठी तलावाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. नांदेड ते अर्धापूर दरम्यान इलेक्ट्रीक बस सुरू होणार आहेत. यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. तर विहिरीत गाळ साचलेल्या १०२ शेतकऱ्यांसाठी विशेष बाब म्हणून रोजगार हमी योजनेतून शासकीय मदत मिळवण्यासाठी खा. अशोकराव चव्हाण यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली आहे. ईदगाह मैदानासाठी निधी आणि उर्दू शाळेसाठी केंद्राकडे पाठपुरावा सुरू असल्याची माहिती जनतेला दिली आहे.

शहरातील विविध विकास कामांचे भूमिपूजन खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ नेते धर्मराज देशमुख, भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, कृऊबाचे सभापती संजय देशमुख लहानकर, माजी सभापती किशोर स्वामी, बी. आर. कदम, नगराध्यक्षा सौ. वैशालीताई देशमुख, मुख्याधिकारी जगदीश दळवी, तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे, संचालक निळकंठराव मदने, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, गटनेते बाबुराव लंगडे, नासेरखाँन पठाण, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेट्टे, जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, प्रदेश चिटणीस रामराव भालेराव यांनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन छत्रपती कानोडे यांनी केले तर आभार चेअरमन प्रवीण देशमुख यांनी मानले. यावेळी उपनगराध्यक्ष मुक्तेदर पठाण, डॉ. लक्ष्मण इंगोले, शहराध्यक्ष योगेश हळदे, मुसव्वीर खतीब, सोनाजी सरोदे, डॉ. विशाल लंगडे, गाजी काजी, प्रदेश सदस्य बालाजी स्वामी, आनंदराव भंडारे, गुरुराज रणखांब, व्यंकटराव साखरे, व्यंकटी राऊत, अभिषेक गुरखेल, उमाकांत सरोदे, नामदेव सरोदे, अजामो जिल्हाध्यक्ष विलास साबळे, माजी सरपंच नामदेव दुधाटे, चंद्रमुनी लोणे, संतोष पवार, जठन मुळे, दत्ता नवले, सचिन कल्याणकर, बाळू माटे, बननराव लोखंडे, दिलीप गायकवाड, जुबेर काजी, राहुल जांगिड, शहबाज पठाण अझर काजी, इरफान खतिब यांसह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो (पुरुष) स्पर्धेत नांदेड, छत्रपती संभाजीनगर, पुणे व मुंबई संघ विजेतेपदासाठी झुंजणार

**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या क्रीडा मैदानावर पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो खो (पुरूष) स्पर्धा सुरू आहेत. बाद फेरीतून पात्रता फेरीत दाखल होण्यासाठी संघात मोठी चुरस निर्माण झाली होती. अतिशय चुरशीचे व अटीतटीच्या सामन्यात महाराष्ट्रातील चार विद्यापीठाने बाजी मारली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आणि मुंबई विद्यापीठ मुंबई या विद्यापीठांनी पात्रता फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे.

येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या क्रीडांगणावर पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो खो (पुरूष) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पाच राज्यातील विविध विद्यापीठाचे संघ सहभागी झाले आहेत. दि. ५ एप्रिल २०२६ रोजी सकाळच्या सत्रात बाद फेरीतून आलेले चार विद्यापीठाचे संघ अनुक्रमे गोवा, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर संघ पात्रता फेरीत दाखल होण्यासाठी प्रतिस्पर्धी संघाशी झुंजले. परंतु या संघाला पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे पात्रता फेरीत दाखल होण्याचे स्वप्न भंगले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या संघाने गोवा विद्यापीठ, गोवा संघावर ११ गुणांनी मात केली. त्यामुळे नांदेड विद्यापीठाने पात्रता फेरीत सहज प्रवेश केला. त्यामुळे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ.भास्कर माने, संघाचे प्रशिक्षक पवन पाटील, व्यवस्थापक महेश वाखरडकर आदींनी संघाचे कौतुक केले.



मुंबई विद्यापीठ व संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती यांच्यात अत्यंत अटीतटीच्या सामन्यात मुंबई विद्यापीठ ५ गुणांच्या फरकाने विजयी झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांच्यात सामना रंगला छत्रपती संभाजीनगर विद्यापीठ संघ ६ गुणांच्या फरकाने विजयी झाले. सावित्रिबाई फुले विद्यापीठ पुणे व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संघातील सामना रंगतदार झाला.

# परभणी रेल्वे स्थानकावर लिफ्टच्या दरवाजाचा लॉक व सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तोडफोड; देखभाल कर्मचाऱ्यावर हल्ला

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागांतर्गत परभणी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २/३ वर दि. ५ एप्रिल रोजी रेल्वे मालमत्तेची तोडफोड व कर्मचाऱ्यावर हल्ला झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, एका अज्ञात व्यक्तीने लिफ्टच्या दरवाजाचे लॉक तोडून लिफ्टमध्ये बसवलेला सीसीटीव्ही कॅमेरा तोडफोड करत असल्याचे आढळून आले. ही बाब ड्युटीवर असलेल्या इलेक्ट्रिकल मेंटेनन्स कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आली. त्यांनी तत्काळ हस्तक्षेप करून संबंधित व्यक्तीला थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र संबंधित व्यक्ती आक्रमक झाली व तिने कर्मचाऱ्याशी शिवीगाळ करत शारीरिक मारहाण केली. या परिस्थितीतही कर्मचाऱ्याने त्या व्यक्तीचा फोटो काढण्यात यश मिळवले व इतर इलेक्ट्रिकल कर्मचारी तसेच रेल्वे संरक्षण दल यांना तत्काळ माहिती दिली.

दरम्यान, अतिरिक्त कर्मचारी व RPF घटनास्थळी पोहोचेपर्यंत ती व्यक्ती तेथून पळून गेली होती. घटनास्थळी तपासणी केल्यानंतर लिफ्टच्या दरवाजाचा लॉक तसेच सीसीटीव्ही कॅमेरा नुकसान झालेल्या अवस्थेत आढळून आले. या घटनेची रेल्वे प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली असून उपलब्ध पुराव्यांच्या आधारे संबंधित व्यक्तीची ओळख पटवून त्याला पकडण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. रेल्वे मालमत्तेचे नुकसान व कर्मचाऱ्यावर हल्ला केल्याप्रकरणी संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच स्थानक परिसरातील संवेदनशील ठिकाणी सुरक्षा व देखरेख अधिक बळकट करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून नुकसान झालेल्या लिफ्टच्या दरवाजाचा लॉक व सीसीटीव्ही कॅमेरा तात्काळ दुरुस्त किंवा बदलण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. भारतीय रेल्वे प्रवाशांच्या सोयीसुविधा व आरामासाठी रेल्वे स्थानकांवर विविध प्रवासी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच त्यामध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील आहे. अशा प्रकारच्या तोडफोडीच्या घटना रेल्वेच्या प्रवासी सुविधा सुधारण्याच्या प्रयत्नांना बाधा आणणाऱ्या ठरतात.

रेल्वे प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, रेल्वे स्थानकांवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या प्रवासी सुविधांचा काळजीपूर्वक व जबाबदारीने वापर करावा. रेल्वे मालमत्तेचे नुकसान होईल असे कोणतेही कृत्य करू नये. तसेच कोणीही प्रवासी सुविधा किंवा इतर रेल्वे मालमत्तेची तोडफोड करताना आढळल्यास त्वरित रेल्वे प्रशासन किंवा रेल्वे संरक्षण दलाला माहिती द्यावी, असे कळविले.

# छत्रपती शिवरायांच्या गुणांचा अंगिकार हे आपल्या जगण्याचे सूत्र असावे –रवीन्द्र पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)** –छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी आपण त्यांचे प्रतिमा पूजन करतो. पण तेवढे पुरेसे नाही. त्यांच्या चरित्रातून जाणवणाऱ्या अलौकिक गुणांचा अंगिकार करणे हे आपल्या जगण्याचे सूत्र असले पाहिजे, असे विचार 'वेध रायगडाचा प्रतिष्ठान'चे विश्वस्त रवीन्द्र पाटील यांनी व्यक्त केले. नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्राच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते 'जगण्याचे सूत्र-शिवचरित्र' या विषयावर बोलत होते.

वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षी शिवाजी महाराजांनी आपल्या निवडक सहकाऱ्यांसह शपथ घेऊन स्वराज्यप्राप्ती हे आयुष्याचे ध्येय ठरवले आणि पुढे या ध्येयसिध्दीसाठी अविश्रान्त कष्ट घेतले. यामधे त्यांची स्वाभिमानी वृत्ती व नियोजनक्षमता सातत्याने दिसून येते. मोहिमेत विजय मिळाला तर त्यामुळे हुरळून न जाता पुढील मार्गांचा विचार ते करीत असत. कधी पराभव झाला तर त्यामुळे खचून न जाता प्रयत्न चालू ठेवीत. यामुळेच स्वराज्यसिध्दीचे ध्येय ते गाठू शकले. हे स्वराज्य रयतेचे राज्य झाले पाहिजे असे प्रयत्न त्यांनी केले. भ्रष्टाचारी अधिकारी व बलात्काराच्या अपराध्यांवर वचक बसविण्यासाठी त्वरित शिक्षा ते देत असत. अशा गुणांची आजही आपल्या समाजाला आवश्यकता आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. शिवचरित्रातील अनेक रोमहर्षक प्रसंग सांगत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

# टायर फुटल्यानेच टिप्पर गोदावरी नदीत कोसळल्याची शक्यता

## शनिवारी घडलेल्या दुर्घनेत एकाचा मृत्यू

**मुदखेड (प्रतिनिधी )** – वाजेगावहुन माळकौठा – महाटी – येळी मार्गे मारतळ्याकडे जाताना टिप्पर या वाहनाचे समोरचे टायर फुटल्यामुळे चालकाचा ताबा सुटल्याने टिप्पर थेट गोदावरी नदी पात्रात पुलावरील लोखंडी कठडे तोडून कोसळले. त्यात सुभाष इरबा मोरे रा. तरोडा नाका ता. जि. नांदेड या इसमाचा जागीच मृत्यू झाला. महाटी येथील तरुणाने मदतीचा तातडीने हात दिल्यामुळे गोदावरी नदी पात्रातील मृत्यूच्या दाढेत असलेला अन्य एक इसम मात्र बालंबाल बचावला असल्याची घटना दि. ४ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजताच्या दरम्यान घडली.

या घटनेची माहिती मिळताच महाटी येथील गुणवंत जाधव, पद्माकर ढगे, संतोष ढगे, बळी पाटील, सरपंच अवधूत ढगे यांनी धाव घेवून नदीमध्ये टिप्पर पडले त्यांना वाचविण्यासाठी मोलाची मदत केली, परंतु एक मृत्यू झाला, एकास जीवदान मिळाले असल्याचे सरपंच प्रतिनिधी बळी पाटील ढगे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



# विठाबाई शिंदे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –भोकर निवासी ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक नारायणराव शिंदे यांच्या पत्नी विठाबाई नारायणराव शिंदे (७२) यांचे अल्पशः आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात चार विवाहित कन्या, एक मुलगा, नातवंडे असा परिवार आहे. रविवार, दि. ५ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता भोकर येथील शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# तिहेरी हत्याकांड : सहा जणांना आठ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवार दि. ३ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या डी मार्ट परिसरामध्ये असलेल्या ई-स्क्वेअरच्या रस्त्यावर गँगवारमधून दोन गट आमने-सामने आले होते. झालेल्या हाणामारीत दोघांची जागीच हत्या करण्यात आली होती तर एका जखमीला रुग्णालयात नेल्यानंतर मयताच्या भावाने त्याच्यावर खंजरने भोसकून खून केला होता. या तिहेरी हत्याकांडाने नांदेड जिल्हा हादरून गेला होता. भाग्यनगर व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी वेगवेगळ्या भागातून मारेकऱ्यांना अटक केली आहे. या प्रकरणात परस्परविरुद्ध दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

भाग्यनगर पोलिसांनी या प्रकरणातील सहा आरोपींना अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना आठ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे.

डी मार्ट तथा कॅनॉल रोडवरील ई स्क्वेअरच्या बाजूला शुक्रवारी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास जुन्यावादाच्या कारणातून काही सदा गँग आणि साईलाला गँगच्या सदस्यांमध्ये तलवार आणि खंजरने मारहाण झाली. या घटनेत सय्यद आवेज सय्यद खलील (वय २७ रा. खुदबेनगर नांदेड), मोहमद अरबाज मोहम्मद फारुख (वय २३ रा. इतका मैदान इतवारा) आणि इतर अज्ञात हल्लेखोरांनी आपल्या दोन मित्रांसह धुरंधर चित्रपट पाहून बाहेर पडलेल्या प्रफुल्ल उर्फ अर्जितसिंघ गजानन चव्हाण (वय ३० रा. तानाजीनगर नांदेड) व त्याच्या साथीदारावर हल्ला केला होता. धारदार शस्त्रांनी वार केल्याने अर्जितसिंघ




(वय ३०) याचा जागीच मृत्यू झाला होता. तर प्रति हल्ल्यात महमद अरबाज याचाही मृत्यू झाला होता. या हल्ल्यात जखमी सय्यद आवेज सय्यद खलील याला पोलिसांनी रुग्णालयात नेल्यानंतर अर्जितसिंग चव्हाण याच्या भावाने रुग्णालयात जाऊन त्याचा खून केला होता.

या प्रकरणात अनिता गजानन चव्हाण यांच्या फिर्यादीवरून मयत प्रफुल्ल उर्फ अर्जितसिंग चव्हाण याच्या खूनप्रकरणी आरोपी साईसिंग गहेरवाल, शाहरुख खान, सोनू राऊत, अवेज सय्यद, महमद अरबाज आणि इतर यांच्याविरुद्ध खुनासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक माळी करीत आहेत. तर दुसऱ्या बाजूला सय्यद खलील सय्यद इब्राहिम याच्या फिर्यादीवरून मयत सय्यद अवेज सय्यद खलील आणि महंमद अरबाज महंमद फारूक यांच्या खूनप्रकरणी आरोपी मयत अर्जितसिंग चव्हाण, नागेश उर्फ लड्ड्या उत्तमराव लड्डे रा. श्रीनगर, संभाजी अनंतराव क्षीरसागर रा. डी मार्ट जवळ नांदेड, प्रदीप गजानन चव्हाण आणि गजानन चव्हाण व त्याच्या इतर साथीदारांविरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात खुनासह आदी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक संतोष तांबे करत आहेत.

# ऑपरेशन यात्री सुरक्षा व अमानत अंतर्गत दोन चोरट्यांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे संरक्षण दलाने सरकारी रेल्वे पोलीस यांच्या समन्वयाने ऑपरेशन यात्री सुरक्षा व ऑपरेशन अमानत अंतर्गत रेल्वे स्थानकांवरील गुन्हे रोखण्यासाठी व प्रवाशांच्या सुरक्षेसाठी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

२ एप्रिल रोजी परभणी रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या मालमत्तेची चोरी व पाकिटमारी रोखण्यासाठी CIB/नांदेडचे एएसआय अमोल वावळे यांनी परभणी कर्मचाऱ्यांसह दक्षता तपासणी मोहीम राबविली. या दरम्यान प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वरील ओव्हरब्रिज जवळ गाड्यांच्या थांब्याच्या वेळी प्रवाशांच्या मालमत्तेची चोरी करण्याच्या प्रयत्नात असलेले दोन संशयित आरोपी पकडण्यात आले. सुमारे १९:३० वाजता, जिल्हा परभणी येथील अरविंद यास गाडी क्र. १७६१४ (पनवेल एक्सप्रेस) थांबलेली असताना चोरीचा प्रयत्न करताना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर सुमारे २१:१५ वाजता, जिल्हा नांदेड येथील प्रेम यास गाडी क्र. १७६८७ (मराठवाडा एक्सप्रेस) थांबलेली असताना चोरी करण्याच्या प्रयत्नात पकडण्यात आले. दोन्ही आरोपींना GRP परभणी यांच्या ताब्यात देण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तसेच २२:०० वाजता, प्लॅटफॉर्म क्रमांक १ वरील बुकिंग काउंटर जवळ पाकिटमारी करण्याच्या प्रयत्नात असलेला नांदेड येथील राहुल याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरुद्ध GRP परभणी यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११० व ११७ अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. याशिवाय ऑपरेशन अमानत अंतर्गत त्याच तपासणी पथकाला प्लॅटफॉर्म क्रमांक ०१ वरील रेल्वे कँटीनजवळ १५ हजार रू. किंमतीचा विवो मोबाईल फोन बेवारस अवस्थेत आढळून आला.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४



ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com